श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-८, अंक-६ | जून-२०२० | स्वागत मूल्य रु. ५०/- | खासगी वितरणासाठी | मासिक, पाने २८ |

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर पुण्यतिथी

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टतर्फे डेरवण येथे बुधवार, दि. २० फेब्रुवारी २०२० रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या निमित्ताने प्रा. सचिन कानिटकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्मारकाला पुष्पांजली अर्पण करून संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात स्वा. सावरकरांचे जीवन आणि कार्य याविषयी व्याख्यान दिले. सभेला विद्यार्थीवर्ग, पालक, शाळेतील अद्यापकवर्ग, तसेच संस्थेतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. कानिटकर आपल्या भाषणात म्हणाले,

‘‘आदिशक्ती भवानीमाता, पुण्यश्लोक छत्रपती शिवाजीमहाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, श्री सद्गुरू सहजानंद सरस्वती स्वामी समर्थ महाराज, श्री दासराम महाराज यांना मनोभावे वंदन करतो. समोर सद्गुरू परमपूजनीय काका आहेत, त्यांना वंदन करतो. आपण सर्व ज्येष्ठ-श्रेष्ठ इथे आहात, आपल्याला वंदन करतो, आणि ही भारतमातेचे भवितव्य असणारी विद्यार्थी विद्यार्थिनी मंडळी इथे आहेत, त्या सगळ्यांना उद्देशून सावरकरांच्या आत्मार्पण दिनाविषयीचे माझे मतप्रकटन आपल्यासमोर करत आहे.




*स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक, श्रीक्षेत्र डेरवण*




*स्वातंत्र्यवीरांना अभिवादन करताना (डावीकडून )- डॉ. सुवर्णा पाटील, सौ. शरयू यशवंतराव, डॉ. विजय डोंबले, प्रा. सचिन कानिटकर आणि श्री. अशोकराव जोशी*

ते सुरु करण्यापूर्वी मी मुलांना मुद्दामहून सांगणार आहे, की या मोठ्या माणसांचे स्मरण करण्यात फायदा काय असतो? निश्चित असतो. आज इथे मी जो सन्मानित होतोय, किंवा अनेकवेळा इथे मला मोठ्या प्रेमाने बोलावण्यात आले आहे, त्यातले एकमेव कारण म्हणजे मोठ्या माणसांचे स्मरण हेच आहे. श्रीकाका जेव्हा आमच्या सांगलीच्या विसावा मंडळात शिवाजीमहाराजांच्या प्रतिमेच्या अनावरणाच्या आदल्या दिवशी आले होते, त्यावेळी त्यांनी 'देव मस्तकी धरावा। अवघा हलकल्लोळ करावा ।।' हा रामदास स्वामींचा संदेश आम्हाला सांगितला होता. आणि शिवाजीमहाराज हे दैवत मस्तकी धरल्यानंतर इथे मला वारंवार पाचारण करण्यात आले. आज सावरकरांसाठी येतोय.

ही मंडळी कायम दातेच असतात. ती कधी याचक नसतात. सावरकरांनी स्वतःचे संपूर्ण आयुष्य हे देशकार्याला दिलेले आहे, समाजकार्याला दिलेले आहे, तुमच्या-आमच्यासाठी दिलेले आहे. त्यांना घ्यायची सवय जन्मभरात नाही. मरणोपरांतसुद्धा ते देतच असतात. आणि त्यांचे देणे जे आहे, त्याविषयी मी आज बोलतो आहे.

आज त्यांचा आत्मार्पण दिन आहे. सावरकरांनी एक फेब्रुवारी १९६६ पासून अन्नपाणी वर्ज्य केले आणि 'धन्योऽहं धन्योऽहं' म्हणत त्यांनी या जीवनाचा निरोप घेतला, कारण केवळ एक, की आता शरीर चालत नाही, तर आता जीवाचा मोह धरायचा नाही. आयुष्यभर त्यांनी मृत्यूशी झुंज दिली, तेव्हा ते घाबरले नाहीत. म्हणजे त्यांनी मृत्यूला घाबरून, जगण्यातील संकटांना घाबरून निरोप घेतलेला नाही, तर 'धन्योऽहं धन्योऽहं' म्हणत त्यांनी जगाचा निरोप घेतला आहे. त्यांनी ते कर्तृत्व कसे केले ते आपण आज अभ्यासायचे आहे.

सावरकरांनी बाजीप्रभूंचा पोवाडा लिहित असताना अनेकांना पाचारण केलेले आहे. हा अभ्यास करताना तुम्हा सर्वांसमवेत त्या सगळ्यांना आपण पण बोलावू या. कारण ही सगळी मंडळी पण आनंदित असणार आहेत, आणि ती आपल्या हृदय सिंहासनावर विराजमान होणार आहेत. म्हणून त्यांना आपण बोलावून घेऊ -

*'चितोडगडच्या बुरुजांनो त्या जोहारासह या,*
*प्रतापसिंहा प्रथितविक्रमा या हो या समया ।*
*तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडा ये ये,*
*निगा रखो महाराज रायगड की दौलत है आयी ।*
*जरीपटका मिरवीत धनाजी संताजी या या,*
*दिल्लीच्या तख्ताची शकले उडवीत भाऊ या ।*
*स्वतंत्रतेच्या रणास्तव मरुनी चिरंजीव झाले,*
*याते तुम्ही राष्ट्रवीर हो, या हो या सारे ।'*

आज आपण बाजीप्रभूंसकट सगळ्यांना बोलावू या, टिळकांना बोलावू या, सावरकरांना बोलावू या कारण सावरकरांचे चरित्र इथे आपण सांगणार आहोत आणि ते ऐकायला त्यांचे आत्मे पण आले पाहिजेत. आणि त्यांना आनंद झाला पाहिजे, की आम्ही या देशाकरिता राबलो, झिजलो, संपलो, पण पुढची पिढी आमचे स्मरण करते आहे. हे सुख फार मोठे आहे. आणि म्हणून आपण त्यांना आमंत्रण द्यायचे आहे, कारण यातच कृतज्ञता आहे.

त्यांचे संपूर्ण आयुष्य हे ही कृतज्ञतेचे मूर्तिमंत उदाहरण आहे. भगूरला सावरकरांचा जन्म झाला. भगूर हे दारणा नदीच्या काठी नाशिकजवळचे एक छोटेसे गाव आहे. आणि त्या गावात लहानाचे मोठे होत असताना लहानपणीच त्यांची आई गेली. वडीलसुद्धा प्लेगच्या साथीत गेले. आणि अशा वेळेला शालेय शिक्षण करीत असताना देशभक्तीचे वारे त्यांच्या डोक्यात घुमत होते. आणखीन एक महत्त्वाची गोष्ट त्यांचे चरित्र ऐकत असताना तुम्ही लक्षात ठेवा, की आपण सगळेजण म्हणतो, की रामायण महाभारत हा आमचा वारसा आहे. पण आपला जीव गेला तरी आपण ते ग्रंथ कधी उघडून बघत नाही. दुर्गाराम आसाराम तिवारींनी सांगितलेले आहे की,

*'विल्यम्साचे म्हणणे कीं कालिदास सत्कवी कसला ।*
*मानिएर बोले त्याला 'कर्ता कृत्रिम कवितेचा ।*

*आम्हाला मान्य असाव्या मत्सरग्रस्त तद्वाचा ।*
*अमुच्या विद्वद्रत्नांना – परके निंदित असताना –*
*तुकवाव्या आम्हीं माना ।*
*ग्रंथही न केवळ बघता – एक काळ ऐसा होता ।।'*

अशी आपली स्थिती आहे. आपण तो ग्रंथच वाचलेला नसतो. पण सावरकरांचे संपूर्ण चरित्र जर अभ्यासायला गेले, तर त्यांनी हे ग्रंथ वाचले होते, याचे अनेक पुरावे त्यांच्या कवितेतून वगैरे मिळतात. संपूर्ण आयुष्य देशाकरिता वाहून टाकल्यानंतर त्यांना वाचनाचा जो काळ मिळाला आहे, तो त्यांच्या बालपणीचा आहे. मुलांनो, तुमच्या वयात त्यांनी जे वाचले होते, ते सर्वसामान्यांच्या डोक्याबाहेरचे आहे.

म्हणजे एका वक्तृत्वस्पर्धेत त्यांचे भाषण झाले. परीक्षकांनी बक्षीस देताना पहिला क्रमांक सावरकरांनाच दिला. बक्षीस देत असताना म्हटले, की हा बोलला छान, परंतु हे भाषण याचे वाटत नाही. कुठल्या तरी मोठ्या माणसाने लिहून दिलेले वाटते. त्या वेळेला सावरकरांनी विरोध दर्शविला आणि स्पष्ट सांगितले की तुम्ही यावर जर अविश्वास दाखवणार असाल, तर तुम्ही ज्ञानेश्वरांवर सुद्धा विश्वास ठेवणार नाही, की त्यांनी ज्ञानेश्वरी किती लहान वयात लिहिली!

प्रत्येक गोष्टीचे असे तर्कशुद्ध प्रतिपादन करताना स्वतःचा अभ्यास परिपूर्ण लागतो, तो सावरकरांनी सातत्याने केला आहे, आणि त्यांच्यात विज्ञानवादाचे बीजसुद्धा लहानपणी बघायला मिळते. लहानपणी ते घरात अरण्यके वाचत होते. आणि अरण्यके ही घरात वाचत नाहीत. आपल्या इथे सुद्धा वेदपाठशाळेत शिकवत असताना अरण्यके शिकवायच्या वेळेला एक पत्र्याचे घर दूर बनवले जाते, त्याच्यात मुले ते शिकत असतात. मग वडील म्हणाले, 'अरे असे अरण्यक घरात वाचू नको' पण सावरकरांना ही प्रत्येक गोष्ट करून पहायची उत्सुकता होती.

आणि स्वातंत्र्य मिळवायचे हे जे 'खूळ' आहे, ते लहानपणापासून त्यांच्या डोक्यात आहे. तुमच्या वयापासूनच आपण सुरुवात करू या आणि मोठ्यांपर्यंत जाऊ या. लहानपणी शाळेतून येताना तिथे कुंपणावर 'विलायती' नावाची फुले असायची. तर हे आणि यांचे मित्र काठ्यांच्या तलवारी करायचे आणि येता जाता ती विलायती फुले अशी तलवारीने उडवत यायचे. का? कारण ती 'विलायती' म्हणजे इंग्रजांची मुंडकी आहेत असा त्यांचा समज होता. आणि असे करत असता असता दामोदर हरी चापेकारांच्या मृत्यूची बातमी केसरीमधून ऐकली आणि ती त्यांच्या हृदयातून आरपार घुसली. ते थेट आपल्या घरातल्या भवानी देवीसमोर आले. पूर्वी त्यांच्या घरावर दरोडेखोरांचा हल्ला झाला होता, त्या वेळेला सावरकरांच्या पूर्वजांनी त्यांचा सशस्त्र प्रतिकार केला होता आणि दरोडेखोर त्यांच्या जवळचे साहित्य टाकून पळून गेले होते, त्यातली ती मूर्ती त्यांच्या घरात पूजनात होती. अष्टभुजा देवीची मूर्ती. आणि त्या देवीसमोर जाऊन स्वातंत्र्यवीर सावरकर बसले. हा एवढासा लहान मुलगा आहे, आणि त्याने शपथ घेतलेली आहे स्वराज्याची की देशाचे स्वातंत्र्य मिळविण्याकरिता शत्रूला मारिता मारिता सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मी मरेतो झुंजेन. आणि चौदाव्या वर्षी देवीला हा जो शब्द दिला तो त्यांनी आयुष्यभर पाळला.

शिवाजीमहाराजांच्या आणि सावरकरांच्या जीवनात अनेक साम्यस्थळे आढळतात. सावरकरांनी स्वतः सांगितलेले आहे, की माझा कान धरायचा अधिकार कोणाला असेल, तर तो शिवाजीमहाराजांना. बाकी कोणाला नाही. माझ्याइतके कर्तृत्व करा आणि मग माझ्यावर टीका-टिपण्णी करा, असे त्यांनी सांगितले आहे. लोक उगीचच करत असतात, हा भाग वेगळा. पण त्यावर बोलण्याचा अधिकार फक्त शिवाजीमहाराजांना आहे सांगितले, कारण त्यांनी आयुष्यात शिवाजीमहाराजांचा आदर्श अनेक वेळेला सांभाळलेला आहे,

त्यातील पहिली गोष्ट, जशी महाराजांनी लहानपणी शपथ घेतली, तशी सावरकरांनी लहानपणी शपथ घेतलेली आहे. चौदा आणि सोळा, दोन वर्षाचा फरक आहे. आता मुलांकरिता सशस्त्र क्रांती म्हणजे काय हा भाग मला थोडा समजावून सांगितला पाहिजे. आणि तिथून आपण सावरकरांच्या आयुष्यातील अतिशय उत्तम आणि महत्त्वाच्या अशा घटनांकडे जाणार आहोत.

आपल्या भारताला स्वातंत्र्य तीन मार्गांनी मिळालेले आहे. एक म्हणजे सैन्य विरुद्ध सैन्य. असा युद्धमार्गाने आपण लढा दिलेला आहे. हा लढा जो दिलेला आहे, तो १८५७ चा लढा आहे. आणि याला इंग्रजांनी 'सिपॉयांचे बंड' असे म्हटलेले होते. 'Mutiny' म्हटलेले होते. यावर सावरकरांनी लंडनमध्ये गेल्यानंतर ग्रंथ लिहिला, '१८५७ चे स्वातंत्र्यसमर!' त्यांनी व्याख्येतला फरक दाखवला. बंड हे नोकर स्वतःच्या मालकाविरुद्ध करत असतो. त्याला बंड म्हणतात. आणि शत्रूविरुद्ध केले जाते, ते युद्धच असते. तुम्ही आमचे शत्रू आहात, आणि आम्ही तुमच्या विरुद्ध लढलो आहोत. त्यामुळे ते 'बंड' नाही, ते 'स्वातंत्र्यसमर' आहे. आणि ते '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथातून सावरकरांनी पहिल्यांदा लिहिले. त्याच्यावर इंग्रजांनी बंदी घातली. झाशीची राणी, नानासाहेब पेशवे, बहादुरशाह जफर अशी सगळी मंडळी नेतृत्व करीत होती. हा स्वातंत्र्यलढा त्यांचे सैन्य व आमचे सैन्य असा युद्धस्वरूपाचा होता.

नंतर इंग्रजांनी सरळ सरळ कायदा केला की ज्यामुळे समाज निःशस्त्र राहील. आता आपल्याजवळ शस्त्रे नसतात. आपल्या देशात, आपल्या देवादिकांपासून परंपरा आहे, की शस्त्राशिवाय राहायचे नाही. तुम्ही रामाचा धनुष्याविना एक फोटो मला दाखवा.




*प्रा. सचिन कानिटकर सावरकर चरित्रावर बोलताना*

कधीही दिसणार नाही. राम म्हटले की धनुष्य. भीम म्हटले की खांद्यावर गदा. हनुमान म्हटले की खांद्यावर गदा. श्रीकृष्ण म्हटला की चक्र हे पाहिजेच. देवांनाच नावे नव्हे, त्यांच्या शस्त्रांनाही नावे आहेत. म्हणजे विष्णूचे 'शारंग' नावाचे धनुष्य आहे. अर्जुनाचे 'गांडीव' नावाचे धनुष्य आहे. शंकराचे 'पिनाक' नावाचे धनुष्य आहे. त्याला 'पिनाकपाणि' म्हणतात. पाणि म्हणजे हात. ज्याच्या हातात पिनाक आहे तो. त्याच्या हातातला 'त्रिशूळ' तर सर्वदूर प्रसिद्ध आहे.

म्हणजे शस्त्राशिवाय राहायचे नाही, ही आमची पद्धत होती, रूढी होती, पण इंग्रजांनी शस्त्र बाळगायला बंदी केली. परवान्याशिवाय शस्त्र नाही. सध्या आपण जगतो ते इंग्रज कायद्यानुसार जगतो. आणि त्यामुळे शस्त्र बाळगायला बंदी झाल्यानंतर सैन्य विरुद्ध सैन्य म्हणजे युद्ध हा मार्ग बंद झाला. आणि म्हणून सावरकरांनी विचार केला की आपण व्यक्तिगतरित्या गुप्तपणे शस्त्रे मिळवायची आणि लढायचे. आणि ही जी व्यक्तिगत लढाई केली जाते, त्याला 'क्रांतिमार्ग' असे म्हणतात.

आणि तिसरा मार्ग आहे, की ज्यात माझ्याकडे लढण्याची शक्ती नाही. आणि अशा वेळेला मी फक्त सांगणार माझ्या मनातून की मला तुमची सत्ता नको आहे, आणि मी तुमच्या विरुद्ध आहे. असा जो लढा केला जातो, त्याला 'सत्याग्रह' असे म्हणतात, आणि त्याचे नेतृत्व गांधीजींनी केले. म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात इंग्रजांना मन, मनगट, मस्तिष्क या तीनही मार्गांनी विरोध करून आपण स्वतंत्र झालेलो आहोत, आणि त्यातल्या क्रांतीमार्गाचे नेतृत्व हे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केलेले आहे. हे त्यांचे लढ्यातील मोठे योगदान आहे.

आता त्यांच्या चरित्राला सुरुवात करीत असताना बालपणीची वर्षे मी तुम्हाला सांगतो. आई-वडिलांना गमावल्यानंतर ते शिकायला नाशिकमध्ये आले. आणि शिवाजी हायस्कूलमध्ये ते शिकायला लागले. 'शिवाजी' आयुष्यभर त्यांच्याबरोबर आहे. या माणसाच्या अंगात एवढी प्रचंड प्रतिभा होती, की ते तीळभांडेश्वराच्या ज्या बोळात राहायचे, तिथे एका मोलकरणीचा एक मुलगा होता, गोविंद दरेकर नावाचा. आणि त्याचे पाय अधू होते. त्यामुळे तो बेडकागत उड्या टाकत चालायचा. आधी ते ज्या वस्तीत राहायचे, त्या सहवासाने त्याला लावण्या वगैरे लिहिण्याची सवय होती. शृंगारिक लावण्या. आणि सावरकरांचा स्पर्श झाल्यानंतर तो अप्रतिम देशभक्तिपर काव्य लिहायला लागला, त्याच्या काव्यात जगभराच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास आहे, जो आज शिकलेल्या-सवरलेल्या लोकांना माहिती नाही. *'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले'* ही त्याची कविता गाजली, तिच्यामुळे सावरकरांचे मोठे भाऊ बाबाराव अंदमानला गेले, ती कविता त्या गोविंदाने लिहिली! जो अचकट विचकट लावण्या लिहायचा, तो राष्ट्रकवी म्हणून प्रसिद्धीला आला. म्हणजे *'परिसाच्या संगे लोह बिघडले । लोह बिघडले सुवर्णची झाले ।'* हे सावरकरांच्या सहवासाचे गुपित होते आणि प्रभाव होता. आणि सावरकरांनी तो प्रभाव सर्वदूर निर्माण करायला सुरुवात केली.

त्यांनी दि. १ जानेवारी१९०० ला 'मित्रमेळा' म्हणून एक संस्था स्थापन केली आणि ती पुढे 'अभिनव भारत' म्हणून प्रसिद्धीला आली. स्वातंत्र्यलढ्यासाठी तरुणांना तयार करणे हा अट्टाहास त्यांनी चालू केला आणि पुढचे शिक्षण घ्यायला फर्ग्युसन महाविद्यालयात ते पुण्यात आले. आणि पुण्यात आल्यानंतर एका address च्या वेळेला त्यांनी असे जहाल भाषण केले, की प्राचार्य घाबरले, कारण त्यांच्यावर इंग्रज सरकारचे दडपण होते, (आणि दुर्दैवाने त्यांचे आडनाव 'कानिटकर'च होते,) आणि ते उठून म्हणाले, 'याचे अजिबात ऐकू नका. शुद्ध सैतान आहे हा सावरकर'.

त्या वेळेला सावरकरांनी विदेशी कपड्यांची पहिली होळी पुण्यात केली, तिचे स्मारक पुण्यात आपल्याला बघायला मिळते. त्यांनी बैलगाडीत सगळे कपडे लादले, त्यावर गुलाल टाकला, आणि ते त्या लकडीपुलावरून पुढे ओढत नेले आणि तिथे बाजूच्या शेतात त्यांनी ते कपडे जाळले. त्या वेळेला शिवरामपंत परांजपेंनी स्वतःचा कोट असा हवेत धरला होता, आणि लोकांना सांगितले की 'या कोटाच्या खिशातून हिंदुस्तानचे भरपूर पैसे विदेशात गेलेत. आज हा मी होळीत टाकतो आहे!' असे म्हणून त्यांनी नाटकीयरित्या आगीत कोट टाकला.

हा प्रसंग घडला त्या वेळेला अनेक नेत्यांनी सांगितले की इथे आपण होळी करू या, पण भाषणे दुसरीकडे कुठेतरी करू या. हे जरा जास्तच उग्र दिसेल वगैरे. सावरकरांनी सांगितले, की जर आपल्याला देश पेटवायचा आहे, तर होळीच्या प्रकाशातच केलेली भाषणे प्रभावी ठरतील. भाषणे इथेच होणार. हा पहिल्यापासून त्यांचा

अट्टाहास आहे. टिळकांना त्यांनी स्वतःचे मार्गदर्शक मानलेले होते आणि ते म्हणायचे, ''आम्ही क्रांतिकारक त्या तलवारीची पाती आहोत, ज्या तलवारीची मूठ लोकमान्य टिळक आहेत.'' आणि ह्या मुठीच्या आशीर्वादाने त्यांना 'शिवाजी' स्कॉलरशिप मिळाली. आणि ते विदेशात गेले. जाण्यापूर्वी फर्ग्युसनमध्ये दर शुक्रवारी सगळ्या विद्यार्थ्यांना ते मेसमध्ये एकत्र करायचे आणि सगळ्यांनी मिळून शिवाजीमहाराजांच्या फोटोसमोर शिवाजीमहाराजांची आरती करायची प्रथा त्यांनी चालू केली होती. त्या वेळेला लिहिलेली आरती आहे. 'जयदेव जयदेव जय जय शिवराया । या या अनन्य शरणा आर्या ताराया ।।' आणि त्यात सावरकरांनी त्यांना 'देवाचा अवतार' असे म्हटलेले आहे.

आणि शिवाजी स्कॉलरशिपवर ज्या वेळेला ते बोटीतून विदेशात निघालेले आहेत, त्या वेळची त्यांची कविता मी मुद्दामूहून आपल्या सर्वांना सांगणार आहे. 'तेजस्विता' हा सावरकर चरित्राचा प्राण आहे. असा एक प्रसंग सांगतात. मला नेमका कुठे वाचला तो लक्षात नाही. पण ते बोटीवर हिंडत असताना एक शीख तरुण उदास अवस्थेत उभा होता. त्याला सावरकरांनी विचारले, 'काय झाले तुला?' त्याने सांगितले, 'मी पागोटे घालतो म्हणून त्यावरून ही इंग्रज मुले माझी थट्टा करत आहेत. आधुनिक मुले माझ्या पागोट्याकडे बघून माझी चेष्टा करत आहेत' मग त्यांनी विचारले, 'तू इंग्लंडमध्ये कशाला निघाला आहेस?' – 'शिकायला निघालो आहे'. 'मुक्कामालाच राहणार ना?' 'हो'. 'म्हणजे तुझ्याकडे अशी पागोटी भरपूर असतील'. 'हो आहेत की!' 'ठीक आहे. किती आहेत ती काढ!' आणि त्यांनी बोटीवरच्या भारतीय तरुणांना एकत्र केले. सगळ्यांनी तशा पद्धतीचे फेटे त्याच्याकडून बांधून घेतले, आणि इंग्रज तरुण डेकवरून जिथे हिंडत होते, त्यांच्यासमोर जाऊन ताठ मानेने ते उभे राहिले. 'आता काय म्हणायचे आहे सांगा!' ही तेजस्विता त्यांच्या अंगात एवढी आहे, आणि मदतीला धावून जाणे एवढे आहे, की बालपणीचा त्यांच्या आयुष्यातला एक फार महत्त्वाचा प्रसंग मुद्दामहून तुम्हाला इथे सांगतो.

त्यांच्या वर्गात नाथ महाराजांची कथा त्यांच्या गुरुजींनी सांगितली, की 'नाथ महाराज नदीवर स्नानाला जात होते, आणि स्नान करून परत येताना एक दुर्जन त्यांच्या अंगावर थुंकत होता. थुंकल्यानंतर ते चिडतील अशी त्याची अपेक्षा होती. त्यांची खोडी काढून त्यांना चिडवतोच, म्हणून हा पैज लावून आला होता. १०८ वेळा ही कथा घडली म्हणून सांगितले जाते. मग नाथमहाराजांना तो दुर्जन शेवटी शरण आला. कारण त्याची गालफडे थुंकून थुंकून दुखायला लागली शेवटी. थुंकणार तरी किती वेळा? आणि त्यानंतर तो म्हणाला, 'मी तुम्हाला शरण आलो, तुम्ही अजिबात संतापला नाहीत. मला आश्चर्य वाटले.' त्यावर नाथमहाराजांनी सांगितले, 'का चिडू मी? आमच्याकडे गंगास्नान हे पवित्र आहे आणि त्याने पुण्य मिळते असे सांगितलेले आहे. तर तुझ्यामुळे आज मला ते पुण्य १०८ वेळा मिळाले. त्यामुळे मी तुझा आभारीच आहे.' लोकांना ही कथा खूप आवडते. कारण भारतीय मन श्रद्धाळू असते. आणि ही कथा सांगितल्यानंतर त्या सावरकरांच्या गुरुजींनी त्यांच्या वर्गातल्या मुलांना विचारले, की यावर तुमचा अभिप्राय काय?

मी पण माझ्या डिप्लोमाच्या वर्गात एकदा हा प्रयोग मुलांचा अभिप्राय काय आहे बघण्याकरिता मुद्दामहून केला. तर फार मजेदार मजेदार अभिप्राय आले. सर्वंकष, म्हणजे ९० टक्के मुलांचा अभिप्राय हा येतो, की एक महान कथा आहे. एक दुष्ट अंगावर थुंकत असताना संतांनी ते शांतपणे सहन केले. आणि संतत्वाचा परिचय लोकांना दिला, आणि शांतपणे त्याचे मतपरिवर्तन केले. नाथ महाराज महान होते, हे या गोष्टीतून कळते. आमच्या वर्गातला एक मुलगा उठला, आणि म्हणाला, ' ते तसले मला काही खपले नसते. मी दोन थोबाडीत लावून त्याचे तोंड बंद केले असते!' हाही अभिप्राय १०० टक्के योग्य आहे. कारण सगळ्यांनी असे अंगावर थुंकलेले खपवून घ्यायचे म्हटले तर आपल्या देशात वाटेल ते चालेल! पण यापेक्षा वेगळा अभिप्राय आहे का? माझ्या वर्गातल्या मुलीने दिला. हल्लीची मुले आहेत ना, ती पूर्ण मराठी, पूर्ण हिंदी, पूर्ण इंग्रजी असे बोलत नाहीत. ते सगळे रेडियो जॉकीच असतात. आणि अर्धवट बोलतात.

*'इंग्रजी शिकोनी थोडे पुस्तकी ज्ञान मिळवावें ।*
*एखादी पदवी मिळतां विद्वान म्हणुन मिरवावें ।*
*वाणीचे तांडव करितां परशब्द मध्ये घालावे ।*
*देशाच्या पोकळ गोष्टी । करितांना केवळ ओष्ठीं ।*
*एकाला दुसरा पुष्टी । देई, श्रम कांहि न करितां।'*

अशी सगळ्यांची स्थिती असते. आणि त्यामुळे –

*'देव-धर्म मानुन झूट । घालावा भलता वाद ।*
*संध्या-स्नानें राहोत । जावे नित हाटेलांत।*
*भक्षावें तेथ अभक्ष्य । तें अपेय-पान करीत।*
*डबक्यातिल मंडुक जैसे । भक्षोनी पंकिल घोषें ।*
*डरडरती कटु आवेशें । बोलाव्या कैशा बाता। ...'*

त्यातली ही मुलगी! ती एकदम उठली. आणि ''सर, आय मीन, मला जरा वेगळे सांगायचे आहे.'' असे खांदे उडवत बोलायची पद्धत असते. ''त्यांनी त्या वाईट माणसाच्या नादालाच लागायला नको होते. म्हणजे आय मीन, टाईम वेस्ट होतो ना फुकट! कशाकरिता परत जायचे? सरळ घरात यायचे. तांब्या-बादली घ्यायची, आंघोळ करायची, मोकळे व्हायचे! नाथ महाराज नदीवर कशाला जात राहिले?'' आजच्या संपूर्ण हिंदुस्तानचा हा प्रातिनिधिक अभिप्राय आहे, असे म्हणायला हरकत नाही.

पण सावरकरांच्या वर्गात जेव्हा कथा सांगितली गेली, त्या वेळेला सावरकर वेगळे बोललेले आहेत. त्यांनी पहिल्यांदा दोन प्रश्न विचारले गुरुजींना. ‘मी माझ्या शंका विचारू का गुरुजी?’ ‘हो विचार.’ म्हणाले. ‘‘हे पहा. ‘ही घटना १०८ वेळा घडली म्हणतात. म्हणजे ती निश्चित जास्त वेळा घडली. ती घडताना भरपूर वेळ गेला असेल. आणि त्या वेळेला साधारण सगळेच लोक नदीवर आंघोळीला जायचे. म्हणजे ही घटना घडत असताना अनेकांनी बघितली असेल! ते सगळे बघणारे, हे संतही नव्हते, आणि दुर्जनही नव्हते. मग एक दुर्जन एका संताला छळत असताना हे सगळे बघत का बसले? या सगळ्यांनी त्या दुर्जनाच्या अंगावर जाऊन त्याचा बंदोबस्त का केला नाही? की तो इथे छळायला लागला आहे संताला, आणि तुम्ही सगळे बघत का बसलाय?’

आपल्या देशात हा प्रश्न दिल्लीपासून गल्लीपर्यंत, आत्ता मुद्दामहून दिल्लीचा उल्लेख करतो, की तिथे छळवणूक चालली आहे, आपण बघत का बसलोय? हा खरा प्रश्न आहे. आणि हा संपूर्ण देशाचे दुखणे असलेला प्रश्न आहे आणि बाकीचे बघत का बसले? सावरकरांना ही गोष्ट फार छळत होती. म्हणून त्यांनी प्रतिज्ञा घेत असताना म्हटले, की चापेकरांनी स्वातंत्र्याच्या यज्ञात स्वतःच्या आयुष्याची आहुती दिली, हा यज्ञ जर सामिधेमागून समिधा टाकून पेटवत राहायचा असेल, तर एखादी समिधा मी का होऊ नये? मी माझे आयुष्य का टाकू नये त्या यज्ञात? आणि म्हणून ते स्वतः यात उतरले आणि या त्यांच्या चिंतनाची प्रचिती या डेकवरच्या उदाहरणात येते.

एका भारतीयाला परकीय चिडवत आहेत, आपण बघत बसायचे? तो भारतीय आपल्याबरोबर कसा येईल मग? चल, तू सरदारजी, आम्ही सगळे सरदारजी. आपण हिंदुस्थानी आहोत. आपण एकत्र येऊ या आता बघू या कोणाची टाप आहे चिडवण्याची. ही हिंमत समाजात सावरकर निर्माण करत होते आणि हे त्यांच्या कार्याचे प्रमुख सूत्र होते.

अतिशय कविमनाचा मुलगा आहे हा. आज बऱ्याच जणांचे चरित्र हिंदुस्थानात केवळ लेखक आणि कवी म्हणून महान म्हणून ठरवले गेलेले आहे. त्यांनी काय केले आयुष्यभर? तर कविता




*श्रोतृवर्ग*

लिहिल्या. म्हणून एखाद्या माणसाचे आयुष्य सर्वश्रेष्ठ मानले गेलेले आहे. कविता कशा लिहिल्या? तर लोणावळ्यासारख्या ठिकाणी हॉटेलात राहायचे. बाहेर पाऊस पडतोय दरीत छानपैकी. तो आत रेनकोट घालून, कानटोपी घालून कॉफी पीत पीत, (म्हणजे कॉफी सांगण्यासारखा पदार्थ म्हणून सांगितले) खिडकीतून बघत मग पावसावर कविता लिहायची. आणि मग त्याबद्दल महान कवी म्हणून घ्यायचे. असे सुखाचे आयुष्य जगणाऱ्या लोकांनासुद्धा आपण साहित्यिक म्हणून गौरवतो. तिथे तुरुंगात लिहायला काही नसताना कोठडीच्या भिंतीवर घायपाताच्या काट्याने कविता लिहून हा माणूस अप्रतिम दर्जाच्या कविता लिहिता झालेला आहे. केवळ साहित्यिक म्हणून विचारात घ्यायचे झाले असते, तरी सावरकरांचे जीवन लोकांनी महानच म्हटले असते. पण त्याच्या पलीकडे आहे हा माणूस.

यांनी जाताना डेकवर एक कविता केली. मी मुद्दामहून सांगतो कारण त्या बोटीतून इंग्लंडला जातानाची अवस्था, आणि इंग्लंडहून येतानाची अवस्था यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. जात असताना बॅरिस्टर व्हायला म्हणून ते निघालेत. हा लोकांना सांगायचा हेतू. त्यांचा अंतस्थ हेतू वेगळा आहे. 'मी स्वातंत्र्याकरिता मारिता मारिता मरेतो झुंजेन!' आणि तो नेमका कुठे येतो ते बघू आपण.

पण जाताना त्यांच्या चिंतनात एक अफाट साहित्यिक कल्पनांची अशी कविता निर्माण झाली. 'तारकांस पाहून' असे त्या कवितेचे नाव आहे. सुंदर कविता आहे. मला सगळी तोंडपाठ नाही सांगता येणार, पण मी त्याचा आशय सांगतो. कारण मुलांना तो पटकन समजेल. सावरकरांची भाषा ही संस्कृतप्रचुर होती आणि आताची आपली 'आय मीन' म्हणजे असे आहे, मग काय करायचे? त्यामुळे आपण ते बाजूला ठेवू या. आपल्याला समजेल अशी ती समजून घेऊ.

तारकांना बघितल्यानंतर सावरकर विचार करतात, की विज्ञानात असे सांगितले जाते की हे जळणारे ग्रहगोल आहेत. आणि त्यांचा तो प्रकाश आपल्याला दिसत असतो. त्यात स्फोट होत असतात छोटे छोटे असे, वगैरे. ही शास्त्रज्ञांची भिकार भिंगे जळून जाऊ देत. या शास्त्रज्ञांना काही विचारायला नको. त्यांना कळलेच नाही हे चमकणारे काय आहे! आणि ते म्हणतात, ''अरे, हे काय आहेत माहिती आहे का? समुद्रमंथन ज्या वेळेला झालेले होते, देव, दानव यांनी ज्या वेळेला सगळा समुद्र घुसळला, त्या वेळेला अमृतकलश बाहेर आला. आणि अमृतावरून देव आणि दानवांचे भांडण लागले, त्या वेळेला तो कलश इकडून तिकडे हिंदकळला आणि ते अमृताचे कण जे असे असे उडाले, ते आकाशात तारे बनून राहिले.''

मग पुन्हा पुढच्या कडव्यात दुसरी कल्पना. रावणाने सीतामाईला आकाशमार्गे नेले. आणि आकाशमार्गे नेत असताना ती दुःखाने रडत होती. तिच्या डोळ्यातून जे टप् टप् टप् टप् अश्रू गळले ना, ते चांदण्या बनून राहिलेत.

तिसरी उपमा देतात. शंकराच्या आणि पार्वतीच्या विहाराचे वर्णन महाभारतात वगैरेसुद्धा भरपूर आहे आणि त्या विहाराचा देवांना त्रास व्हायला लागला की हा महादेव किती दिवस असा विहार करीत राहणार आहे बायकोबरोबर? म्हणून त्यांनी जाऊन त्यांचा एकांतभंग केल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे पार्वती माता त्यांना एकदम दचकली. आणि तिच्या गळ्यातली मोत्याची माळ तट्टकन तुटली, आणि ते मोती सगळीकडे विखुरले, ते म्हणजे या तारका आहेत. केवढ्या सुंदर कल्पना आहेत बघा.

आणि शेवटी म्हणतात अरे नव्हे नव्हे, या हिंदुस्थानची भूमी फार जुनी आहे.

*'जग निद्रित होतें जेव्हा, वेदांत घोष करणारे ।*
*जग अज्ञानावस्थेत जेव्हां, शास्त्रे तेव्हां रचणारे ।*
*जग उघडें होते जेव्हा उन्नतिला तैं भिडणारे ।*
*ज्ञानवंत जन मतिमंत - धन विद्येने श्रीमंत - होते येथेच अनंत ।*
*रोमांच येति आठवतां, एक काळ ऐसा होता ।।'*

तिवारींची कविता आहे ही. तर अशा या काळातल्या सगळ्या इतिहासाचे खंड हे चंदेरी वेष्टनात गुंडाळले आहेत म्हटले. आणि ते ग्रंथालय म्हणून आकाशात ठेवलेत, ते म्हणजे तारका. केवढी भव्य कल्पना आहे बघा त्यांची. आणि देशाविषयी चिंतन. वय किती असेल सांगा मला! तेवीस वर्षे वय होते. अठराशे त्र्याऐंशी साली जन्मले, आणि १९०६ ला ते बोटीवरून विलायतेला निघालेले आहेत. आणि त्यातून विलायतेला पोहोचल्यानंतर बॅरिस्टरकीचे शिक्षण चालू असताना त्यांनी तिथल्या तरुणांना संघटीत करणे सुरू केले.

तोवर भारतीय तरुण काय करायचे? तर इंग्रजांचे भारतीय तरुणांवर फार 'प्रेम' होते विलायतेमध्ये. आणि विशेषकरून राजघराण्यातले तरुण, त्यांना आम्ही परदेशात शिकवतो म्हणून, इंग्रज इकडून पकडून न्यायचे. त्यांचा एक रेसिडेंट म्हणून अधिकारी प्रत्येक संस्थानिकापाशी असायचा. तो मुलांना ताब्यात घ्यायचा. का? तर याच्यामागे मोठा डाव होता. १८५७ चा संपूर्ण स्वातंत्र्यलढा भारतीय लोक हे राजघराण्यांवर श्रद्धा ठेवून त्या नेत्यांच्या भोवती एकत्र येऊन लढल होते. मग राजघराण्याचाच माणूस हा व्यसनी आणि बाहेरख्याली जर झाला, तर पुन्हा स्वातंत्र्यलढा निर्माण होणार नाही. म्हणून या मुलांना इंग्लंडला शिकायला म्हणून न्यायचे, त्यांना मद्यपी करायचे, त्यांना पार्टीत जायला शिकवायचे, त्यांना डान्स करायला शिकवायचे, याकरिता इंग्रजांचे एक उच्चवर्णीय अधिकाऱ्यांचे मंडळही असायचे. आणि हे सगळे भारतीय तरुण असे वागायला लागले की इंग्रज खुश असायचे, की हा भारतीय तरुण आता व्यवस्थित आणि शिस्तबद्ध झाला आहे.

सावरकर गेल्यानंतर यात फरक पडायला लागला. इंडिया हाउस, चंडास हॉल अशा ठिकाणी देशभक्तीच्या सभा व्हायला लागल्या. आणि सावरकर तरुणांना एकत्र करायला लागले, आणि देशभक्तीच्या गोष्टी सांगायला लागले, स्वतः ब्रिटीश लायब्ररीत बसायला लागले. इटलीचा स्वातंत्र्यलढा अभ्यासला. जोसेफ मॅझिनीचे चरित्र भाषांतरित केले. त्याला विस्तृत प्रस्तावना लिहिली. ती पुढे अनेक भारतीय तरुणांनी पाठ केलेली आहे. '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' ग्रंथ लिहिला. शिखांचा इतिहास लिहिला. सगळेच तरुण वाचत नसतात. मग सगळ्या तरुणांना एकत्र करून हा आपला अभ्यास त्यांना समजावून सांगू लागले. त्यातून तरुण मंडळी एक एक एक तयार व्हायला लागली. याच्यात हा बोटीवरचा कार्यकर्ता पण सामील झाला. त्याचे नाव हरनामसिंग. खान नावाचा एक मुसलमानपण जोडला गेला. पारशी माणसे जोडली गेली. आणि असे करता करता ही संख्या वाढायला लागली. सावरकरांनी १९१० साली लंडनमध्ये पहिली शिवजयंती साजरी केली. शत्रूच्या राजधानीत शिवजयंती करणारा पहिला माणूस आहे हा आणि तेव्हा प्रचंड गर्दी जमलेली होती.

फावल्या वेळात सावरकर लंडनमध्ये हिंडायचे. आणि आपल्याला माहिती आहे, परदेशात माणूस जाऊन आला, की तिथले गोडवे आपल्या इथे फार गात असतो. सगळे काही तिथे भारी आहे, आणि इथे नरक आहे, अशा पद्धतीची मनोवस्था अनेकांची असते. आणि सावरकर नेमके वेगळे काहीतरी हेरत होते. त्यांनी सांगितले, की इथे बेकार लोकांचे तांडेच्या तांडे हिंडत आहेत. इथे पार्लमेंटच्या जागा पैसे घेऊन वाटल्या जात आहेत. सावरकरांचे लंडनची बातमीपत्रे म्हणून चाळीस पत्रांचे पुस्तक आहे. त्याच्यावर अख्खे व्याख्यान होईल, एवढे अप्रतिम पुस्तक आहे. त्यात ते लिहितात, की पार्लमेंटच्या जागा पैसे घेऊन विकल्या जातात. त्या वेळेला आपल्याकडे पार्लमेंट नव्हती. म्हणजे हा अवगुण कुठून आला हे लक्षात ठेवा! 'काळ' आणि 'विहारी' नावाच्या वृत्तपत्रांना सावरकर तिथून लिहून पाठवत होते. त्यांनी महिलांच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या आंदोलनाचा वृत्तांत त्यात लिहिला आहे.

सगळ्या मुलांना आवडेल अशी गोष्ट सांगतो. ते लंडन टॉवरमध्ये गेले. का गेले ? तर त्यांना कळले होते की शिवाजीमहाराजांनी अफझलखानाला मारण्यासाठी वापरलेली वाघनखे ही लंडन टॉवरमध्ये म्युझियममध्ये ठेवलेली आहेत. आणि त्या वेळेला चिंतन लिहिलेले आहे ते फार भारी आहे. ते म्हणाले, वाघनखे बघायला निघालो खरा, पण मनात माझ्या भीती वाटायला लागली आहे, की जावे का नाही? कारण वाघनखे त्या अफझलखानाला फाडून बरीच वर्षे शांत राहिलेली आहेत. ती भुकेली असणार. आणि हा गुलाम कोण आला? आम्ही स्वतंत्र नाही ना, आम्ही पारतंत्र्यातले आहोत. आणि आम्ही तरुण असून स्वातंत्र्य मिळवू शकलो नाही आहोत. मग हा नादान गुलाम कोण आला, म्हणून ती शिवनृपतीची वाघनखे चिडतील, आणि काचपेटीतून बाहेर येऊन माझाच कोथळा काढतील. म्हणून मला भिती वाटायला लागली, कारण त्यांना स्वातंत्र्याची ओढ आहे. तरीही मनाचा हिय्या केला. मला एक खंत वाटत होती, की भगवंताने स्वतःचे दिव्यदर्शन देत असताना अर्जुनाला दिव्यदृष्टी दिली. तशी दिव्यदृष्टी मला दिली तर फार बरे होईल. मग मला ती वाघनखे बघता येतील. म्हणजे एखाद्या गोष्टीच्या मागे चिंतन कसे आहे बघा!

''आणि ती वाघनखे बघायला गेल्यानंतर शेवटी असे झाले, की मी जवळ गेलो, आणि मला त्यांच्या दिव्यत्वाचा स्पर्श काही जाणवेना. असे का झाले? म्हणून मी काचपेटीत जरा जवळ जाऊन बघितले. तर तिथे असे लिहिले होते, 'टायगर क्लॉज, (वाघनखे) युज्ड बाय राजा शिवाजी, टू एन्टरटेन वॉरीयर अफझलखान (त्याचा पाहुणचार करत असताना शिवाजींनी वापरलेली वाघनखे) वेअर लाईक धिस'. ती यासारखी होती. म्हणून सावरकर म्हणतात तो दिव्यत्वाचा स्पर्श मला जाणवला नव्हता.

मग त्यांनी जवळ जाऊन ते वाचले. ते म्हणाले, वाघनखे ही अशी असतात, ही मात्र आम्हाला म्हैसूरच्या दरोडेखोराकडे सापडलेली आहेत!

१८५७ चा स्वातंत्र्यलढा, त्याला १९०७ साली किती वर्षे झाली सांगा? ५० वर्षे झाली! आणि तो उत्सव त्यांनी लंडनमध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला. त्या वेळेला त्यांनी बॅजेस तयार केले. आणि सगळे भारतीय तरुण देशभक्त ते बॅजेस असे छातीवर लावून अभिमानाने लंडनमधून हिंडत होते. त्यात तो खान आणि हरनामसिंग कृषी कॉलेजमध्ये होते. आणि त्या कृषी कॉलेजमध्ये 'सारेंसेस्टर' वगैरे त्याचे नाव आहे काहीतरी, त्या कृषी कॉलेजमध्ये शिकत असताना तिथल्या प्राचार्यांनी त्या बॅजवरच्या झाशीच्या राणीला बघून अनुदार उद्गार काढल्यावर यांनी 'तुझे कॉलेज सोडले!' असे त्याला सांगून ते थेट हॉस्टेलवर निघून आले. आणि तिथून कॉलेजलाच जाईनात. इंग्रजांचा मोठा डाव होता, की मुसलमान आणि शीख यांना हिंदूंविरुद्ध उभे केले तर ते आपसांत भांडतील, आणि या देशावर राज्य करणे सोपे जाईल. आणि इथे नेमके जे दोन देशभक्त कॉलेज सोडून गेलेत, त्यातला एक मुसलमान खान आहे, आणि दुसरा हरनामसिंग आहे. 'प्राचार्याला आम्ही माफी मागायला लावतो, तुम्ही कॉलेजला या' अशी विनवणी त्यांना करण्यात आली. तरी त्यांनी सांगितले, 'माझ्या देशभक्तांचा, नेत्यांचा अपमान करण्यात आला आहे, आम्हाला तुमची डिग्री नको'. आणि या लोकांना डिग्री देण्याकरिता म्हणून सावरकरांनी एक वेगळा कार्यक्रम आयोजित केला, आणि पंजाबच्या धनादेवी नावाच्या एक मोठ्या

बाई होत्या, श्रीमंत होत्या, त्यांच्या हस्ते या दोघांना सर्वानुमते 'यार-ए-हिंद' नावाची पदवी देण्यात आली. का? तर यांनी पदवी नाकारली आहे म्हणून. त्या वेळेला त्या धनादेवी म्हणल्या, ''मला पाच मुले आहेत, त्या पाच मुलांपैकी एकाने जरी अशी पदवी मिळवली, तर माझे मातृत्व धन्य होईल!''

म्हणजे सावरकर हे देशवासियांच्या मनात देशभक्ती कशी प्रज्वलित करीत होते हे लक्षात घ्या. आणि दुसरा प्रसंग घडला तो दुसऱ्या कॉलेजमध्ये. त्या विद्यार्थ्याला एका इंग्रज विद्यार्थ्याने तो बॅज बघून चिडवल्यावर या विद्यार्थ्याने पायाला सॉक्समध्ये बांधलेला सुरा बाहेर काढला आणि तो त्या चिडवणाऱ्याच्या मागे लागला. ही लंडनमध्ये घडलेली घटना आहे. आणि त्या विद्यार्थ्याचे नाव आहे मदनलाल धिंग्रा. तो पुढे क्रांतिकारक म्हणून अजरामर झाला. हा मदनलाल धिंग्रा सावरकरांच्या सहवासात आल्यामुळे असा झाला होता.

इंग्रजांच्या बैठकी व्हायला लागल्या, की 'हिंदी पोरे आता बिघडली आहेत'. बिघडलेत म्हणजे काय? 'दारू प्यायला येत नाहीत. नाच करायला येत नाहीत. तर हे काहीतरी देशभक्तीचे उद्योग करतात, आणि ते 'इंडिया हाउस' म्हणजे 'हाउस ऑफ मिस्ट्री' झालेले आहे.' म्हणजे या माणसाने तिथे जाऊन केवढा फरक पाडला आहे, याचे हे अप्रतिम उदाहरण आहे.

या मदनलाल धिंग्राने कर्झन वायली नावाच्या माणसाला तिथे ठार मारले. या घटनेमागे फार मोठी घटना घडली आहे. कुठली, तर १८५७चा स्वातंत्र्यलढा दडपत असताना इंग्रजांनी आपल्या अनेक माणसांना ठार मारले आहे इथे येऊन, आणि त्यांची प्रेते झाडाला टांगली, आणि झाडाला टांगताना त्यांच्या देहाचे इंग्रजी आकडेबिकडे तयार केले. कोणाचा आठ आकडा करून टांगले, कोणाचा सहा आकडा करून टांगले आणि हसत होते. म्हणजे संपूर्ण देश आपला. मूठभर इंग्रज तिकडून इकडे आले. आणि आपल्या लोकांना असे ठार मारत होते. एकही माईचा लाल त्यांना मारणारा पैदा होत नव्हता. सावरकरांच्या डोक्यात हे घुमत होते, की अरे माझ्या भारतमातेची कूस काही वांझ नाही वीरत्वाच्या बाबतीत. इंग्लंडमध्ये येऊन इंग्रजाचे रक्त नाही सांडले, तर नाव बदलीन अशी मनात प्रतिज्ञा होती, आणि कर्झन वायलीला मारून ते करून दाखवले. परिणाम व्हायचा तोच झाला. सावरकरांना अटक झाली १३ मार्चला. आणि त्यांना बोटीतून भारतात परत आणायला लागले.

बोटीतून इकडे आणत असताना आपल्या सर्वांना माहिती आहे, की मार्से बंदरात बोट लागलेली असताना सावरकरांनी त्या बोटीच्या संडासातून उडी मारली. नेहमी चकवा द्यायला शिवाजीमहाराजच आठवायचे त्यांना! ते पेटाऱ्यातून निघून जातील असे कधी कुणाला वाटले का? शिवाजीमहाराज निघून गेले! तसे संडासातून कुठला कैदी उडी मारेल असे इंग्रजांना वाटले नव्हते, तरी त्यांचे लक्ष असायचे. त्या संडासाला सुद्धा एक काच होती. आणि त्या काचेतून आत बघायचे, की कैदी नेमका काय करतोय! सावरकरांनी काय केले? नाईट गाऊन अंगावर होता. अजून त्यांच्यावर खटला व्हायचा होता ना, त्यामुळे कपडे नेहमीचेच होते. आत गेल्यानंतर तिथल्या दाराला ती जी काच होती, तिच्यावर नाईट गाऊन लावला. नंतर स्वतःचे जानवे काढले, आणि जानव्याने त्या बोटीचे जे भोक होते जाणारे त्याचे माप घेतले, आणि आपले शरीर जाऊ शकते म्हटल्यावर ते शरीर त्यातून घातले. तुम्ही कल्पना करा, 'उडी मारली' एका शब्दात सांगता येते. पण खाली खडक आहे, की खोल पाणी आहे, की नेमके काय आहे, अंदाज नाही. पण बोट मोठी आहे, आणि आत उभी आहे, त्या अर्थी काही होणार नाही, या तर्कानुसार त्यांनी तिथून उडी टाकली. त्या वेळेला खरचटणार आहे आणि खरचटल्यावर खाली समुद्राचे खारे पाणी आहे. काय होईल कल्पना करा. पण धाडस, आणि स्वातंत्र्याचे वेड असे आहे, की आयुष्यभर दुसरा काही विचारच नाही. आणि ते पोर्टहोलमधून बाहेर घुसले, पाण्यात पडले. इथे त्यांचा मोठा बेत होता, पण फ्रेंच पोलिसांनी त्यांना पकडले, आणि ते पुन्हा इंग्रजांच्या ताब्यात आल्यानंतर इंग्रजांनी बोटीवर घेतल्यानंतर त्यांना खूप मारहाण केली.

मारहाण सुरू झाल्यानंतर त्यांनी इंग्रजांना त्या अवस्थेतही धमकी दिली. ''याद राखा पुन्हा माझ्या अंगाला हात लावाल तर! एवढासा दिसत असलो तरी तुमच्यापैकी एकाचा बळी घेतल्याशिवाय मी मरणार नाही!'' तिथून इंग्रज त्यांच्याशी जपून वागायला लागले, आणि त्यांना मग घाणेरड्या जागी ठेवले. बोटीतले संडास कसे होते, तर अर्ध कापलेले पिंप असायचे, बॅरल आणि त्या बॅरलवर कैद्याने जाऊन उभे राहायचे आणि आपले शौचकर्म आटपायचे. अशा त्या पिंपाच्या शेजारी सावरकरांना बसायला लावले. हा घरात वरण-भातावर साजूक तूप खाणारा असा शुद्ध जेवणारा ब्राह्मण आहे, आणि याला काय भोगायला लागले आहे तुम्ही कल्पना करा. नरक यातना म्हणजे वेगळ्या नसतात. आणि अशा ठिकाणी बसल्यानंतरसुद्धा सावरकर एक चिंतन करतात, ते म्हणतात की अरे, विष्ठेच्या पिंपाला का घाबरतोस? नाहीतरी तुझे पोट म्हणजे विष्ठेचे पिंपच आहे की. रोज ते बरोबर घेऊनच तू हिंडत असतोस. आणि शेवटी जसे पचन हे गरजेचे आहे, सेवन हे गरजेचे आहे, तसे पचन होऊन रेचन हे सुद्धा गरजेचेच आहे देहधारणासाठी. शरीराला उपयुक्तच क्रिया आहे. याच विष्ठेचे पुढे खत होते. खतातून नवे झाड येते आणि झाडातून नवे अन्न निर्माण होते. हे सृष्टीचे चक्र आहे.' असे चिंतन त्यांनी केले आहे. आचार्य अत्र्यांनी एक सुंदर ओळ हे चिंतन वाचल्यावर लिहिली आहे. ते म्हणतात, 'ज्वालामुखीच्या

मुखात उगवलेली मोगऱ्याची वेल म्हणजे हे सावरकरांचे चिंतन आहे'.

आणि आता त्यांना अंदमानची काळ्यापाण्याची शिक्षा होणार, किंवा फाशीची शिक्षा होणार, हे जेव्हा दिसायला लागले, त्या वेळेला ते म्हणतात, *'अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला। मारिल मज जगती असा कवण जन्मला ।।'* संपूर्ण भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान यात आहे. *'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि। नैनं दहति पावकः।'* मानसिक ताकद बघा त्यांची!

त्यांच्यावर इथे खटला व्हायचा होता, त्या वेळेला डोंगरीच्या तुरुंगात ठेवले होते, आणि बायको भेटायला आली. मेव्हणा आणि पत्नी. लग्न तर कसे झाले होते, गंमतशीर! सावरकर ज्या वेळेला कॉलेजला जाऊन शिकणार म्हणत होते, त्या वेळेला खूप खर्च येणार होता. आणि यांची परिस्थिती गरिबीची होती कारण लहानपणी आई-वडील गेले होते. बाबाराव म्हणजे थोरले भाऊ प्रपंच बघायचे. तर सावरकरांचे एक मामा होते. ते आले, 'तात्या, तुझे लग्न ठरवून आलो बघ. तुझे सासरे तुझ्या शिक्षणाचा खर्च करणार आहेत'. म्हणजे तात्यांनी मुलगी बघितलीच नाही आणि ते लग्न झालेले आहे. आणि पुन्हा विरह किती, लग्न होऊन ते लंडनला गेले, तेविसाव्या वर्षी. तिथून इंग्रजांच्यात सापडले. परत आणले. आता भेट कधी बायकोची? बायको त्या तुरुंगात भेटायला आली आहे बिचारी. पूर्वी वागण्याला फार मर्यादा असायची. मोठ्या लोकांदेखत नवरा बायको एकमेकांकडे बघायचे सुद्धा नाहीत, असा काळ होता तो. आणि त्यामुळे त्या बाई येऊन नुसत्या उभ्या राहिल्या. तिथे तो पोलीस अधिकारी आहे. तो बघतो आहे. त्याच्यादेखत काय बोलणार आहेत ही नवरा बायको? भेट आली आहे, असे कळल्यावर यांना बेड्या घातल्या होत्या, तर बेड्या आपल्या अंगात आहेत, बघून त्यांना दुःख होऊ नये, तर या बेड्या काही फारशा त्रासदायक नाहीत, या हलक्या आहेत हे दाखविण्यासाठी सावरकर त्या बेड्यांचा मुद्दामहून खळखळ खळखळ आवाज करत करत करत बाहेर आले. का, तर त्या हलक्या आहेत वाटावे! आणि तिथे येऊन ते म्हणतात, की ''विलायतेहून बॅरिस्टरकीच्या डौलदार झग्यात माझे आगमन होईल या प्रतीक्षेत तुम्ही असणार, पण मला कैद्याच्या कपड्यात बघून फार वाईट वाटून घेऊ नका. काय आहे, थंडीपासून संरक्षण आणि लज्जारक्षण हा जो कपड्यांचा हेतू असतो, तो या कपड्यातसुद्धा पूर्ण होतो. पुढे संसाराचा विचार कराल, तर चार काटक्या गोळा करून, चूल बोळकी मांडून, मुलांची वीण वाढवून, असा संसार तर पशु-पक्षीही करत असतात. यापेक्षा भव्यतर संसाराचा जर अर्थ लावायचा असेल, तर असा विचार करा की आपणच आपली चार चूलबोळकी फोडून टाकली, ज्यायोगे इतरांच्या घरातून सोन्याचा धूर निघेल!'

इतर म्हणजे कोण हो? इतर म्हणजे तुम्ही आम्ही आहोत. आणि आपल्या घरातून सोन्याचा धूर निघावा एवढ्या भव्य इच्छेने स्वतःच्या संसाराची होळी या माणसाने केली. त्याचे स्मरण करायचे नाही तर जगात कोणाचे स्मरण करायचे हो?

माणूस जन्माला येत असतो. अनेक ऋणे फेडण्याकरिता जन्माला येत असतो. ती ऋणे कुठली असतात? मातृ ऋण, पितृ ऋण, आचार्यांचे ऋण, समाजाचे ऋण, देशाचे ऋण, धर्माचे ऋण एवढे फेडल्याशिवाय मरायचे नाही. ही ऋणे फेडण्याकरिता हे जीवन आहे. यातील काही स्वार्थाची ऋणे आहेत. आई वडिलांची सेवा करणे स्वार्थच आहे. पण तो स्वार्थ जेव्हा मोठा मोठा होत जातो, त्या वेळेला तो परमार्थाला जाऊन भेटत असतो. म्हणजे माझा देश, माझा देव. हे भव्य होत चालले. आणि हेच स्वार्थाचे मोठे रूप आहे, त्याला परमार्थ असे म्हणतात.

जीवन जगायचा त्यांचा उद्देश हा लहानपणापासून पक्का आहे. आणि म्हणून ते सांगतात की 'इतरांच्या घरातून सोन्याचा धूर निघेल.' आणि त्यानंतर त्यांच्यावर खटला झाला.

लोक थट्टा करतात बऱ्याच वेळेला. आमच्या सांगलीचे एक विद्वान म्हणायचे, ''मी तिथे गेलो होतो. गुडघाभर पाणी आहे. ते समुद्र पोहले वगैरे खोटे सांगतात!'' भरती ओहोटीचे तत्वज्ञान सगळ्यांना माहिती आहे ना? जिथे पाणी दिसत नाही, तिथे दोन माणसे बुडतील एकावर एक उभी राहिलेली, एवढे पाणी येत असते. मग या मंडळींनी काय बघितल? कधी बघितले? जाऊ दे. आपण तो कोळसा उगाळायला नको. पण या माणसाची इच्छा काय होती लक्षात आले असेल.

आणि पन्नास वर्षांच्या दोन काळ्यापाण्याच्या शिक्षा ठोठावल्यावर काय झाले असेल? अहो घरावर जप्ती आली. भर पावसात घरातील बायकांना बाहेर काढलेले आहे लहान मुले घेऊन. आणि त्या वेळेला त्या बायकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झालेत, कारण थोरले बाबाराव, ही जी 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले' गोविंदांची कविता सांगितली ना; ती कविता प्रकाशित केली म्हणून त्यांना अंदमानला पाठवले. दुसरे तात्याराव अंदमानात. आता घरात एकटे धाकटे ते नारायणराव आहेत आणि ही सगळी बायका मंडळी, की जी त्या वेळेला कामावर, नोकरीवर जात नव्हती. जगायचे कसे प्रश्न होता. हे राष्ट्रकवी गोविंद होते ना, ते काळाराम मंदिरात जाऊन बसायचे. देवाची गाणी म्हणायचे, धर्माची, देशाची गाणी म्हणायचे, त्या वेळेला दर्शनाला येणारी माणसे 'कोणी बघत नाही ना' असे बघून त्यांच्यासमोर मूठभर तांदूळ ठेवून जायचे, ते गोळा करून सावरकरांच्या घरात आणून दिल्यावर त्यांच्या घरात स्वयंपाक व्हायचा. त्या पोरांना काहीतरी खायला मिळायचे. पंचेचाळीस दिवस त्या बाईने 'पिंडाचा भात' खायला घातलेला आहे. भोगणे

म्हणजे काय असते, याची आपल्याला फारशी जाणीवच नसते!

त्यांच्या चरित्राचे मुख्य भाग होतात, त्यातील बालपर्व मी तुम्हाला सांगितले, लंडनपर्व सांगितले, आता अंदमानपर्व! आणि इथे कोलू ओढणे, किंवा घाणेरडे साणेरडे खायला लागणे, काथ्या कूटणे असे प्रचंड कष्टाचे प्रसंग वारंवार तुमच्या सर्वांच्या कानावर लहानपणापासून आले असतील. त्यातील गांभीर्याचा भाग असा आहे, की पोट बिघडलेले असताना ती जी काही कोठडी असायची कैद्याची, त्यातून संडासला जातो म्हटले तर सोडायचे नाहीत. एकदा सायंकाळी अडकवला कैदी तो दुसऱ्या दिवशी सुटायच्या वेळेलाच सुटायचा. आणि एक लोटके ठेवलेले असायचे पाण्याचे. प्यायला तेच, स्वच्छतेला तेच. लघवी लागली तर कुठे करायची प्रश्न असायचा. तुम्हाला त्यातले गांभीर्य मुद्दाम सांगतोय. काही काही वेळेला पोटे बिघडायची. कारण अन्न काय खायला मिळायचे! ते मुसलमान आचारी असायचे. ते पहाटेच्या वेळेला कैद्यांचे अन्न शिजवायचे. आणि रॉकेलची अशी टिवळी असायची, आपण चिमणी बिमणी म्हणतो की नाही. त्याने ते शिजले की नाही असे तिरके करून बघायचे, त्यावेळेला ते रॉकेल त्यात सांडायचे. आणि त्या रॉकेलचा वास त्या अन्नाला लागायचा, तरी ते खायला लागायचे. त्यात बऱ्याच वेळेला गोमा पडलेल्या असायच्या भाजीबरोबर. कोण स्वच्छता बघणार हो कैद्यांची! आणि खारट पाण्याची विहीर होती. तिचे पाणी मिळायचे आंघोळीला कधीतरी. आणि अशा अवस्थेत हा माणूस तिथे राहत होता. तर पोट-बीट बिघडले तर घाण झाली म्हणून बेडीला असे टांगून ठेवायचे. पोट बिघडलेले असताना तिथेच त्यांना रेच व्हायचे, हे बाबारावांचे वर्णन आहे. तरीही त्यांना बेडीतून सोडले जायचे नाही. आणि पुन्हा घाण का केली, म्हणून त्याची शिक्षा वेगळी केली जायची. अशा वेळेला तात्यारावांचे जेलमध्ये आगमन झाले, तर तिथला तो जेलर फार प्रसिद्ध, 'बारी'. आणि तो बारी म्हणायचा, 'दोनच देव, एक वर, तो आकाशातला आणि दुसरा इथला मी, अंदमानातला!' आणि सावरकरांना जेव्हा चार जणांनी त्याच्यासमोर धरून आणले होते, त्या वेळेला अगदी रस्त्यात किंवा सिनेमात दाखवतात तसा प्रसंग घडला. त्या गेटच्या दरवाज्याच्या आत आल्या आल्या बारी म्हणाला, ''सोड त्याला, तो काही वाघ आहे का?'' म्हणजे बारीला स्वतःची दादागिरी दाखवायची होती की हा आलेला माणूस महत्त्वाचा आहे हे त्याला कळले होते कोण जाणे! आणि मग तिथे तो संवाद झालेला आहे, की 'पन्नास वर्षे....?' मग त्यावेळेला सावरकर म्हणाले, ''तुझे सरकार तरी राहणार आहे का पन्नास वर्षे? मी निश्चित बाहेर पडेन!' आणि मग तुरुंगात गेल्यानंतर यांनी अनेक प्रकारचे सत्याग्रह चालू केले. 'माझी जन्मठेप' म्हणून सावरकरांचे जे पुस्तक आहे ना, ते तुम्ही वाचा. त्यातील काही उताऱ्यांचे कागद मी आणलेले आहेत तुम्हाला वाटण्याकरिता. ते वाटले जावेत. ते तुम्हाला मिळाल्याशिवाय तुम्ही जाऊ नका बरं का! त्यात सावरकरांचा जीवनपट आहे एका कागदावर. आणि दुसऱ्या कागदावर त्यांनी माफीची पत्रे लिहिल्याबद्दल जे बोलले जाते तो मजकूर आहे, तो त्या 'माझी जन्मठेप' मधला मजकूर आहे. त्यांनी सांगितले की 'अशी माफी तेवीस किल्ले देताना मिर्झाराजे जयसिंगासमोर शिवाजींनी सुद्धा मागितली.'

अशी बुद्धी चालवायची असते राजकारणात. आणि सांगायचे काय की अंदमानला वाघाचे गुहा समजायचे. आत येणारी पावले दिसतात. बाहेर जाणारी दिसत नाहीत. कारण कैदी शेवटी कंटाळायचे. हे सगळे चांगल्या घरातील लोक होते. ते दरोडेखोर नव्हते, चोऱ्यामाऱ्या करत नव्हते, खून बलात्कार करत नव्हते. तर ते स्वातंत्र्याचा लढा लढत होते, त्यांना चांगल्या रीतीने ठेवायला पाहिजे होते, त्याऐवजी त्यांचे कुत्र्यासारखे हाल केले जात होते, आणि याला वैतागून बरेच कैदी आत्महत्या करीत होते. त्यांना सावरकर सांगत की 'अरे अशी आत्महत्या करायची नाही. उद्या या इथे जर पुतळे उभारले जातील, तर तुमचे आमचे उभारले जातील'.

(आपल्या गळ्यातील बिल्ला दाखवत प्रा.कानिटकर म्हणाले-) हा बिल्ला मी तेवढ्याकरिता गळ्यात घातला आहे बरं का. ही त्यांच्या गळ्यातील बिल्ल्याची ही प्रतिकृती आहे. यावर त्यांचा कैदी नंबर आहे, त्यांच्यावरची कलमे आहेत. हा मुद्दामहून का घातला, तर यात ही सावरकरांची इच्छा आहे. सगळ्यांचे मनोबल वाढवताना ते सांगत होते की ''अरे आत्महत्या करू नका, आपण देशासाठी आलोय, उद्या हा देश स्वतंत्र झाल्यावर आपले पुतळे इथे उभे केले जातील. तुम्ही कशाकरिता म्हणून घाबरता?'' तर त्यांच्या बिल्ल्यापासून लोक लांब पळायचे. तो दागिना म्हणून घातला होता बरं का लोकांनी नाशिकमध्ये! आपल्या इथलेच भक्त श्री. सुधीर पैठणकर यांनीच कार्यक्रम आयोजित केला होता आणि मला बोलावले होते. आणि तिथे नगरसेवक श्री. शाहू खैरे वगैरे संयोजक होते. लोक चांदी आणि सोन्याचे प्लेटिंग करून हे बिल्ले घालत होते. ही सावरकरांची इच्छाच पूर्ण झाली!

तर अशा रीतीने त्या तिथे अंदमानात त्यांनी लोकांचे मनोबल वाढवायचे काम केलेले आहे. स्वतःचे मनोबल ढासळू द्यायचे नाही, आणि दुसऱ्याचे वाढवायचे. आणि त्या वेळेला साक्षरतेची मोहीम राबवली. सगळ्यात मोठा फरक त्यांनी आपल्या धर्माच्या बाबतीत तिथे केलेला आहे. काय व्हायचे, तिथे चणे-फुटाणे अन्न आले, की मुसलमान लोक पटकन जाऊन सगळ्या पोत्यांना शिवायचे. त्याला शिवले की आपले कैदी ते खायचे नाहीत आणि उपासमार व्हायची. सावरकरांनी पहिल्यांदा ते खायला शिकवले त्यांना. त्यांनी शिवले म्हणून काय झाले? आणि त्यानंतर त्यांनी तिथे इतके मतपरिवर्तन केले की ज्याचे वर्णन त्यांनी 'टीचभर हिंदुराष्ट्र' म्हणून केले आहे. जे

सगळे ‘सलाम वालेकुम’ म्हणायचे ते शेवटी ‘राम राम’ म्हणायला लागले सावरकर कैदेतून सुटेपर्यंत. एवढा फरक त्यांनी केला. आणि त्यातील अनेक संवाद अभ्यासण्यासारखे आहेत.

उल्हास करदत्त नावाच्या एका क्रांतिकारकाला वेड लागते. सावरकर फार हुशार आहेत, हे बारीलासुद्धा आता समजलेले होते. कारण त्यांची इंग्लंडमधली कीर्ती सगळी रेकॉर्डमध्ये आलेली. तर बारीलासुद्धा मध्येच हुक्की यायची त्यांच्याशी जाऊन संवाद करण्याची. त्या उल्हास करदत्तला वेड लागल्यानंतर सावरकरांच्या मनावर त्याचा काय परिणाम होतोय अभ्यासायला बारी तिथे आला. त्यांना ‘बॅरिस्टर बाबू’ म्हणायचे सगळे कैदी. किंवा ‘बॅरिस्टर’ म्हणून. तो बारी आला की ते कोठडीपाशी येऊन गजाला धरून उभे राहायचे.

‘‘उल्हास करदत्तला वेड लागले!’’ ह्यांना ते कळलेले असायचे बरं का! ‘‘असे? मग?’’ ‘‘व्हेन इज युवर टर्न? - आता तुमची पाळी कधी?’’ जेलर विचारतो. सावरकर शांतपणे म्हणतात, ‘‘आफ्टर यू, सर !’’ काय मनोबल आहे! मिर्झाखान म्हणून एक वॉर्डन होता. इंग्रजांची ती रणनीती तिथेसुद्धा होती. तिकडे सगळे अधिकार मुसलमानांच्या हाती दिले होते आणि यांचे हाल करायचे एवढी त्यांना ड्युटी दिली होती. त्यात ‘नानी गोपाल’ नावाचा एक क्रांतिकारक सावरकरांच्या सहवासात तयार झाला होता. आणि त्याने ठरवले, ‘‘मी बंड करतो! कोण येतो वाटेला बघू या !’ आणि त्याने त्या दिवशी अन्नपाण्याचा सत्याग्रह चालू केला. आणि एकमेकांशी बोलायला बंदी होती तर त्याने सर्वांसमोर भाषणच चालू केले. भाषण चालू केल्यानंतर पोलिस त्याच्या मागे लागले. पोलीस मागे लागल्यावर हा वरच्या माळ्यावर चढला. तिथे पोलिस त्याला पकडण्यासाठी धडपडायला लागले. हा त्यांना जेलभर पळवायला लागला. सापडल्यावर खूप मार खाल्ला. पण शेवटपर्यंत तो काही त्यांचे ऐकायला तयार नाही! सावरकर अतिशय आनंदित झाले त्याच्या सगळ्या वीरश्रीवर! आणि त्या वेळेला तो मिर्झाखान येऊन सावरकरांना म्हणतोय कसा? महत्त्वाचा संवाद आहे! ‘‘बॅरिस्टर बाबू, ये नानी गोपाल हिंदू नही हो सकता. इसका बाप मुसलमान होगा!’’ ‘‘का?’’ ‘‘हिंदूंमध्ये इतकी सहन शक्ती कुठे आहे? एवढा मार खायच्या आत, तो लगेच काय म्हणाल ते ऐकायला तयार झाला असता! हा एवढा मार खाल्ला. इतके छळले त्याने सगळ्या पोलिसांना. हा जरूर पठाण्याचा बच्चा आहे आमच्यासारखा!’’ किती अपमानकारक वाक्य आहे बघा. तरी सावरकर कसे बोलतात बघा! ‘‘मिर्झाखान, तू सांगतोस त्याप्रमाणे तर तो जरुर हिंदूचाच मुलगा असला पाहिजे. अरे मुसलमान पठाणाचा मुलगा असता तर तो तुझ्यासारखा त्या बारीचे तळवे चाटत बसला असता, विरोध कशाला केला असता?’’ कितीही हाल झाले तरी कधीही स्वतः चा बाणा त्या माणसाने सोडला नाही. आणि त्यांना माहिती होते की ‘राजक्षमा’ वगैरे कधी येईल, राणीचा कुठला तरी महत्त्वाचा वाढदिवस आहे, तर काही कैद्यांना सोडणार आहेत असे कळले, की मग ते त्या कैद्यांना सगळ्यांना सांगायचे, की ‘‘अरे इंग्रज म्हणत आहेत त्याच्यावर सगळ्यांनी सह्या करा आणि बाहेर जावा. बाहेर जाणे आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. पुन्हा कार्य करता येते. करायचा तोच उद्योग आपण करायचा.’’

मुलांनो, तुम्हाला दिलेल्या त्या कागदात लिहिले आहे ते वाचून बघा, की हे मान्य करून एक टोळी सुटली, ती पुन्हा देशभक्तीची गाणी म्हणतच गेली. तो जेलर एवढा संतापला की ‘‘हे नालायक इथे पुन्हा आल्याशिवाय राहणार नाहीत’’ असे त्याचे मत झाले. म्हणजे ती मंडळी त्या क्षणापुरतीसुद्धा बदललेली नव्हती, एवढी प्रेरित झालेली मंडळी सावरकरांनी तिथे तयार केली आणि या जेलमध्ये त्यांचा धर्माचा वगैरे अभ्यास अतिशय परिपूर्ण झाला कारण सगळ्यांचा सहवास आलेला होता, आणि तिथेसुद्धा त्यांचे राष्ट्राविषयीचे चिंतन कायम चालू होते. ते म्हणायचे ‘‘हिंदुस्थान स्वतंत्र झाला तर हा अंदमान हा मोठा नाविक तळ होईल.’’ आणि पुढे हिंदुस्थानने त्यांचे ऐकले बरं का! त्यांच्या बऱ्याच गोष्टी सरकारने ऐकल्या आहेत. त्यांना नावे ठेवतात, पण ऐकतात त्यांचेच! ते पत्र लिहायचे अनेक वेळेला, ‘हिंदी राष्ट्रभाषा झाली पाहिजे’ यावर सावरकरांची आग्रही पत्रे आहेत आणि सावरकरांनी भरपूर प्रमाणात मार्गदर्शन केलेले आहे. जगाचा इतिहास त्यांना पक्का माहिती होता.

एक सगळ्यात सुंदर प्रसंग सांगतो. प्रसंग असा आहे, की सावरकरांचे देशाचा इतिहास आणि सगळे चिंतन, पुराण कसे पाठ होते हे यातून दिसते. त्याकरिता शंकराचार्यांच्या एका प्रसंगाची आठवण करून देतो. शंकराचार्यांनी द्वैत-अद्वैत मतावर वाद घालून सगळ्या देशात अद्वैत मत प्रस्थापित केले आणि धर्माच्या सर्वोच्च सरस्वती पीठावर ते आरुढ झाले. कुमारिलभट्ट नावाचे एक मोठे विद्वान होते. आणि त्यांचा पराभव करायचा म्हणून शंकराचार्य तिथे गेले. त्या वेळेला कुमारिलभट्ट यांनी आत्मार्पण करायचे ठरवले होते. म्हणून अशी भाताची तुसे रचली होती, आणि त्या तुसांना आग लावून त्याच्यावर ते बसले होते शांतपणे. का? तर त्यांनी बौद्ध धर्माचे ज्ञान घेण्याकरिता तिथे ‘मी बौद्ध आहे.’ असे खोटे सांगून त्यांनी ते ज्ञान घेतले होते आणि मग तिथे त्यांनी स्वतः चे मत प्रस्थापित केले होते. आपण फसवून ज्ञान घेतले याचा पश्चाताप म्हणून कुमारिलभट्टांनी आत्मार्पण करायचे ठरवले होते. आणि म्हणून मग ते स्वतः अग्नीवर बसलेले होते. आणि अग्नी खालून जळत येत होता यांचा देह जळणार होता, त्या वेळेला शंकराचार्य तिथे पोहोचले. आणि म्हणाले ‘‘मला तुमच्याशी वाद घालायचा आहे. तुम्ही कुठे निघालात? माझे मत प्रस्थापित करायचे

आहे'' त्या वेळेला कुमारिलभट्ट म्हणाले, ''मी आता जगाचा निरोप घेत आहे.' म्हणजे काय दर्जाचे लोक होते आपले, लक्षात घ्या! स्वतःच्या देहाला आग लागली आहे आणि तो माणूस म्हणतोय, ''आता मी निरोप घ्यायला लागलोय, आता आपला वाद कसा होऊ शकेल?' शंकराचार्य म्हणाले, ''काय करू मी? तुम्ही जर वाद घालणार नसाल तर खरे तत्वज्ञान कुठले हे कळायचे कसे लोकांना?' तर त्यांनी सांगितले, ''माझा मंडनमिश्र नावाचा एक शिष्य माहिष्मती नगरीत राहतो. तो पूर्ण तयार झालेला आहे. मी आता निघतो पण तू त्याला जर पराभूत केलंस, तर मला पराभूत केल्यासारखे आहे. त्यामुळे तिकडे जा.' शंकराचार्य मंडनमिश्राच्या गावाला गेले. तिकडे पाणवठ्यावर काही बायका पाणी भरत होत्या. त्यांना त्यांनी विचारले की मंडनमिश्राचे घर कुठे आहे? त्यांनी सांगितले ''या रस्त्याने जा आणि एका घरापाशी त्या झाडावरचे पशुपक्षी पोपट मैना संस्कृत मध्ये वाद-विवाद करीत असतील, ते घर म्हणजे मंडनमिश्राचे घर आहे. *जानीहि तत् मंडनमिश्र कक्षा ।* '' मग शंकराचार्य तिथे गेले वगैरे.

आणि ते लिहितात की, बऱ्याच वेळेला सावरकरांना एकांतवासाची शिक्षा दिली जायची. कुठले जर बंडबिंड त्यांनी तिथे केले, त्या बारीविरुद्ध लढा दिला, की त्यांना एकांतवास, म्हणजे चार चार सहा सहा दिवस माणूस भेटू द्यायचा नाही. मग त्या कोठडीत ते एकटे असायचे. मग कुठे बघणार? तर बाहेर पक्षी वगैरे कुठे काही दिसतायत का चुकून, असे बघत बसायचे. तिथे साळुंख्या खूप दिसायच्या त्यांना. त्यांनी लिहिले की 'साळुंख्यांचा माझा अभ्यास खूप झाला. साळुंख्यांची भाषा मला कळायला लागली. त्या कधी खेळायला बोलवतात ते कळले. त्या कधी चिडतात एकमेकांवर ते कळले. संकट आल्यावर त्या कशा ओरडतात, आता युद्ध करणार आहेत तर, त्यांचे बोलणे कसे असते, मला त्यांची भाषा कळायला लागली. आणि मी माझ्या खोलीत त्यांना बोलावू शकेन इथपर्यंत मी पारंगत झालो. पण मी बोलावले नाही, कारण कायद्याने त्यावर निर्बंध होता. असे झाले असते तर ती खिडकी बंद केली असती. म्हणून मी ते कधी केले नाही.'

जर मला 'अनुमती' मिळाली असती', 'अनुमती' म्हणायचे ते 'परवानगी' शब्द वापरायचे नाहीत. भाषाशुद्धी हा सावरकरांचा फार महत्त्वाचा विषय होता. 'परवानगी' हा शब्द सुद्धा विदेशी, 'अनुमती' हा स्वदेशी. तर अनुमती मला जर मिळाली असती, तर मी त्या सगळ्या साळुंख्यांना बोलावले असते, आणि त्यांनाही देशभक्तीची, स्वातंत्र्याची गाणी शिकविली असती आणि त्यांची गाणी ऐकून लोकांनी एकमेकांना सांगितले असते, जिथल्या साळुंख्या स्वातंत्र्याची गाणी गातात, 'जानीहि तत् बंडनमिश्र कक्ष' तो मंडनमिश्र, हा बंडनमिश्र. बंड करणारा. 'बंडनमिश्र कक्षा'. इतका अप्रतिम असा अभ्यास, इतके अप्रतिम मन, इतकी अप्रतिम प्रतिभा, इतकी तेजस्विता, पण संपूर्ण आयुष्य त्या तुरुंगात सडत काढायला लागलेले होते. मग पुढे मोठे आंदोलन उभारले. आणि त्यानंतर अनेकांनी सह्यांची मोहीम काढली. धाकटे भाऊ तिथे कार्यरत होते, त्यात गांधीजींनी सुद्धा मागणी केली आणि असे करत करत शेवटी सावरकरांची सुटका झाली आणि त्यांना भारतात आणण्यात आले.

त्यानंतरही त्यांचा तुरुंगवास सुरू होता. आणि सरतेशेवटी तो तीन-चार वर्षांचा तुरुंगवास झाल्यानंतर त्यांना रत्नागिरीला स्थानबद्ध ठेवण्यात आले. इंग्रजांची ही रणनीती होती की जो त्रास देणारा नेता आहे, त्याला कधीही जनतेसमोर ठेवायचे नाही. त्यामुळे वासुदेव बळवंत फडक्यांना त्यांनी एडनला टाकले होते, सावरकरांना अंदमानला, टिळकांना मंडालेला. जे सुखकर नेते आहेत, त्यांना देशात अटक करायची. का तर अटक झाली की लोकांच्या भावना जागृत होत असतात. आणि ते त्याच्याकडे आकृष्ट होत असतात. आणि ब्रह्मदेशाचा थिबा राजा मात्र यांनी आणून रत्नागिरीत ठेवला होता. ही त्यांची रणनीती होती. पण शेवटी सावरकरांच्या बाबतीत त्यांचा नाइलाज झाला. सावरकरही म्हणाले की मी राजकारणात पडत नाही, तर मला सोडा आता. आणि त्या वेळेला सावरकरांना रत्नागिरीत आणून स्थानबद्ध ठेवण्यात आले, म्हणजे रत्नागिरी गाव सोडून जायचे नाही अशी बंदी घालण्यात आली. गाव सोडायचे तर कलेक्टरची परवानगी घ्यायची आणि मग सोडायचे.

मग आता राजकारण करायचे नाही तर काय करायचे? आणि तिथे त्यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला की सप्तबंद्या तोडायच्या, आणि समाजकारण करायचे. म्हणजे आधी टिळकांच्या मार्गाने जात होते आणि आता आगरकरांच्या मार्गाने जायला लागले. आणि त्यात त्यांनी इतक्या टोकाची पावले उचलली आहेत, की सगळ्यांनी चकित होऊन जावे. त्यांच्या पत्नीला वगैरे तिथे येऊन राहण्याची परवानगी मिळाली, तर स्वतःच्या घरातल्या स्त्रियांना, अन्य ब्राह्मण स्त्रियांना हरिजन वाड्यात हळदीकुंकवाला पाठवायला सुरुवात केली. तिथल्या हरिजन बायकांना स्वतःच्या घरात हळदीकुंकवाला निमंत्रित केले. त्यांनी पतितपावन मंदिर जे बांधले, ते केवळ दलितांना मंदिर प्रवेश नव्हता म्हणून बांधले. भागोजी कीर शेठ त्यांची मदत घेऊन. तिथे शंकराचार्यांना बोलावले, आणि तिथे तत्कालीन भंगी जातीच्या मुलाकडून हार घातला. केवढी क्रांती आहे ही! देशात त्या वेळेला हे काम व्हावं अशी इच्छा व्यक्त करणारे अनेक लोक होते, ते प्रत्यक्षात करणारे फक्त सावरकर होते. आणि विठ्ठल रामजी शिंद्यांनी ते काम तिथे जाऊन बघितले आणि त्यांनी हे उद्गार काढले की,''जे व्हावे असे आम्ही म्हणत होतो ते हा माणूस आधीपासून करतोय, त्यामुळे आमचे उरलेले अर्धे आयुष्य याला मिळू दे!'' तिथे त्यांनी सहभोजने चालू केली. म्हणजे सर्व जातीच्या लोकांनी एकत्र येऊन जेवायचे.

शाळेत वेगळे बसवणे होते ते बंद केले. सगळ्यांनी एकत्र बसायचे. हे आत्ता बोलतोय एवढे त्या वेळेला सोपे होते का? त्या वेळेला सनातनी मंडळी होती, रूढींचा प्रभाव होता, त्यांचेही काही चूक नव्हते हो. वर्षानुवर्षांनी आई-वडिलांनी जे सोवळेओवळे पाळलेले आहे, ते एकदम तोडायचे म्हटल्यानंतर सगळ्यांना शक्य नव्हते. ही मंडळी सावरकरांना नावे ठेवायची. त्यांना विरोध करायची. हे हट्टाला पेटलेले. हे ऐकायचे नाहीत. लोक देशभक्त म्हणून त्यांचा सन्मान ठेवायचे. पण याबाबतीत तुम्ही आम्हाला काही सांगायचे नाही असा लोकांचा हट्ट असायचा. हे त्याच्या उलटे! हे दसऱ्याला जायचे. उदाहरण सांगतो फक्त. 'दामले आहेत का?' बाहेरून ओरडायचे. लोकांना आनंद व्हायचा की अरे सावरकर आले! सोने द्यायला आले आहेत! सावरकर सोने द्यायला आलेत म्हटल्यानंतर दामले अतिशय खुश व्हायचे. ''या या या !'' ''माझ्याबरोबर अमुक जातीचा अमुक अमुक आहे, त्याच्यासकट यायचे असले तर येतो. नाहीतर तुमच्या घरात येत नाही.' म्हणजे लोकांना अट्टाहासाने सगळ्यांना स्वीकारायला कसे लावले याचे मोठे उदाहरण आहे. आपले सद्गुरु सहजानंदसरस्वती महाराजसुद्धा याच दरम्यान त्यांच्या सहवासात आलेले असणार रत्नागिरी मुक्कामी. आणि हा सावरकरांचा मोठा प्रभाव आहे. यांच्या विचारात दिसते बघा.

आपण मागे एका पुस्तिकेवर छापले होते की तुम्ही आम्हाला डुकराचं मांस खायला घाला नाही तर कशाचे घाला. काही धर्म बाटत नाही. गोमूत्र शिंपडले, आणि शुद्ध झाले म्हणून सांगितले, की विषय मिटला! हे तत्वज्ञान सावरकरांनी तिथे तुरुंगात वापरले होते. त्या वेळेला लोक मुसलमानांनी शिवलेले खायचे नाही म्हणून उपाशी राहत होते. असा हा जो धर्माचा, जो रूढींचा बेकार पगडा होता, तो दूर करायला त्यांनी खूप प्रयत्न केले आहेत.

आणि त्यातील महत्त्वाच्या प्रयत्नांचे सांगायचे झाले तर त्या वेळेला त्यांनी नाटके लिहिली. उःशाप, सन्यस्त खड्ग ही नाटके लिहिली. आणि ही नाटके दाखवत असताना नाट्यगृहातील पहिल्या दोन रांगा या पूर्वास्पृश्यांसाठी राखून ठेवीत असत. पूर्वास्पृश्य हा त्यांचा शब्द. अस्पृश्यांसाठी राखीव असे ते म्हणायचे नाहीत. 'पूर्वास्पृश्य'. ज्यांना पूर्वी अस्पृश्य म्हटले जायचे ते. त्यांच्याकरिता त्या रांगा राखीव. आणि त्यांनी पहिल्या रांगांत येऊन नाटक बघायचे, हे सावरकरांनी चालू केले. त्यांनी अस्पृश्यांचा एक बँड निर्माण केला. का, तर लग्नकार्यात या बँडच्या निमित्ताने त्यांना बोलावले जाईल. अट्टाहास बघा किती आहे प्रत्येक गोष्टीतला. कार्य करायचे तर मनापासून, सोंगाचे नाही. भिडून करायचे. त्यांनी तिथे अस्पृश्यांचा बँड चालू केला. एकदा तर एका भंगी जमातीच्या मुलाची त्यांनी वरात काढली. मी पुढे असे वर्णन वाचले आहे की, स्वतःच्या मुलीच्या लग्नात जास्त खर्च होतो आहे म्हणून वरातीला फाटा द्यावा का असा विचार ते करत होते. आणि इथे समाजकार्यासाठी त्या मुलाची वरात काढली आहे त्यांनी. आणि मुद्दामहून सवर्णांच्या वस्तीतून नेली. बायका वगैरे ते बघायला यायच्या आणि सावरकरांना नावे ठेवायच्या, 'जळले मेल्याचे तोंड' म्हणून. एवढा विरोध सहन करून हा माणूस ते काम अट्टाहासाने करत राहिला, कारण हा सगळा हिंदूधर्म एक झाल्याशिवाय देश प्रबल होणार नाही. तर जाती जाती सगळ्या एकत्र आल्या पाहिजेत, भेद मिटला पाहिजे, म्हणून अट्टाहास चाललेला होता. याला शुद्धीच्या आंदोलनाची जोड मिळाली, म्हणजे मुस्लिम झालेल्यांना शुद्ध करून घ्यायचे. आत्ता सांगलीत बापूराव साठे म्हणून आहेत त्यांची जन्मशताब्दी चालू आहे. त्यांनी शुद्ध केलेली माणसे आम्हाला बघायला मिळत आहेत, की जी मुसलमान होती. हा सावरकरांच्या आंदोलनाचा परिणाम आहे. समुद्रबंदी, ती मोडली. अनेक रुढींच्या बंदी मोडून काढण्याचे आंदोलन त्यांनी उभे केले. आणि सगळा नवा विचार लोकांना दिला. आणि त्यांनी सांगितले,

*'आसिंधुसिंधूपर्यंता यस्य भारतभूमिका*
*पितृभू-पुण्यभूश्चैव सा वै हिंदू रीती स्मृता।'*

अशी त्यांनी व्याख्या केलेली आहे. आसिंधुसिंधूपर्यंता म्हणजे - समुद्र म्हणजे सिंधू, आणि सिंधू म्हणजे सिंधू नदी, या सिंधूपासून त्या सिंधूपर्यंत हा सगळा भूभाग पसरला आहे हा भारत भूभाग आहे, आणि हा भारत स्वतःची पितृभू म्हणजे वडिलार्जित भूमी आणि पुण्यभू म्हणजे धर्मसाधनेची भूमी असे जे मानतात ते ते सगळे हिंदूच आहेत असे या व्याख्येत म्हटले आहे. आणि हे सावरकरांनी देशाच्या एकात्मतेकरिता उचललेले पाऊल आहे.

एक सगळ्यात महत्त्वाचा प्रसंग सांगतो. त्यांनी गोव्याकडची स्वच्छता कामगारांची सहा मुले रत्नागिरीला स्वतःच्या घरात शिकायला ठेवली होती. रत्नागिरीच्या विठ्ठल मंदिरात मंदिर प्रवेशाचे आंदोलन त्यांनी आयोजित केले. तिथे कलेक्टर आला होता, तो इंग्रज होता. आणि सावरकरांच्या बाजूची मंडळी, आणि सावरकरांना विरोध करणारी मंडळी, अशी सगळी मंडळी तिथे एकत्र आलेली होती. आणि दोन्ही गट समोरासमोर आल्यानंतर तेथे वाद विवाद सुरू झाला. विरोधी मंडळींनी सांगितले की मंदिर प्रवेश होता कामा नये. सावरकर म्हणाले, ''मंदिर प्रवेश झाला पाहिजे !'' ते म्हणाले, ''तुमच्या देवाला कुत्रे शिवलेले चालते, मांजर शिवलेले चालते, माणूस शिवलेला का चालत नाही? आत जाऊन दर्शन घेणार!'' आणि शेवटी त्या मंदिर प्रवेशाची परवानगी त्यांनी मिळवली. आणि त्याचा सगळा आराखडा त्यांच्या मनात आधी तयार होता, ते नाटककार होते ना उत्तम, सन्यस्त खड्ग वगैरे त्यांच्या नाटकातले प्रवेश बघण्यासारखे आहेत. आणि नाटकातील गीतेसुद्धा त्यांची अप्रतिम आहेत. 'मर्मबंधातली ठेव ही'- त्यांचे आहे. 'शतजन्म शोधताना शत आर्ती व्यर्थ झाल्या' हे सावरकरांचे

गीत आहे. म्हणजे तो सैनिक सुट्टीवर येतो, बायकोला भेटणार, अशी स्थिती असते, आणि एकदम त्या वेळेला त्याला तार येते 'ड्युटीवर हजर राहायचे आहे', आणि 'तो क्षणात गेला सखी हातचा सुटोनी' हे त्यावर लिहिलेले वाक्य आहे. म्हणजे अशी अप्रतिम प्रतिभा असलेला हा माणूस आहे.

शिवू नावाचा छोटा मुलगा आहे सहा वर्षाचा आणि त्यांनी त्या मुलाकडून एक गाणे बसवून घेतलेले आहे. कुठले गाणे आहे? *'हे सुतक युगाचे तुटले रे। विधीलिखित विटाळही तुटले रे। जन्माचे भांडण मिटले रे । आम्ही शतकाचे दास। आज सहकारी। आभार जाहले भारी । आभार जाहले भारी ।'* असे गाणे आहे. आणि ते गाणे त्या मुलाला शिकवले.

दोन्ही बाजूला दोन्ही पक्ष होते, त्यातून त्या मुलाच्याकरवी मंदिर प्रवेश करायचा, तर त्या मुलाला शिकवून तयार ठेवले होते. तो मुलगा ते गाणे म्हणत म्हणत म्हणत मंदिरात गेला आणि मंदिरात गेल्यानंतर डोळे मिटून म्हणत होता, भक्तिभावाने म्हणत होता, आणि गाणे संपल्यानंतर त्याने डोळे उघडले तर समोर पांडुरंग. आणि त्या वेळेला तो म्हणाला, 'माझ्या जन्माचे सार्थक झाले त्या क्षणाला, की पांडुरंगाचे दर्शन मी घेऊ शकलो आणि हे केवळ माझ्या आयुष्यात घडले ते सावरकर नावाच्या परिसस्पर्शाने!' हा लेख उपलब्ध आहे बरं का. ते शिवु चव्हाण पुढे इचलकरंजीत समाजाचे अध्यक्ष म्हणून होते. त्यांची संघटना त्यांनी स्थापन केली होती. ते म्हणाले सावरकर विचार माझ्या लोकांना शिकवायला मी खूप प्रयत्न केला, पण सावरकरांचा प्रभाव माझ्याजवळ नसल्याने आमचे लोक व्यसनाधीनतेतून फारसे मुक्त झाले नाहीत, पण तरीही मी स्वतः व्यसनी झालो नाही हा चमत्कार फार मोठा होता, आणि तो सावरकरांचा होता. त्या शिवु चव्हाणांचे वंशज आत्ता कोल्हापुरात राहतात. आणि त्यांना आम्ही हुडकून काढले, त्यांना आणले आणि त्यांच्यादेखत हा सगळा प्रसंग सांगून हे 'आभार जाहले' गाणे वाजवत वाजवत त्यांचा सत्कार केला. त्या मंडळींनासुद्धा खूप बरे वाटले. अंत:करण भरून आले. सावरकरांनी केवढे मोठे काम केले आहे याचा हा मोठा पुरावा आहे.

आणि ही सगळी कामे केल्यानंतर त्यांना रत्नागिरी सोडायची परवानगी मिळाली आणि मग हिंदुमहासभेचे नेते म्हणून सावरकर देशभर फिरले आणि मग देशाच्या फाळणीविरुद्ध! देशाच्या फाळणीची लाट चालू झाली. आता सारखेच वेगळा देश मागायची जेव्हा लाट चालू झाली, त्या वेळेला सावरकरांनी खणखणीत इशारा दिलेला आहे, 'याल तर तुमच्या सवे, न याल तर सोडून, विरोध केला तर मोडून, हा अखंड देश स्वतंत्र झाला पाहिजे' हा आग्रह सावरकरांनी धरलेला आहे. पण दुर्दैवाने आपली जनता त्यांच्यामागून गेली नाही. याचे कारण असे होते, की गांधीजींचे सत्याग्रहाचे आंदोलन सर्वदूर पसरलेले होते. आणि सावरकरांनी ही घोषणा दिल्यानंतर जनता सावरकरांकडे आकृष्ट होईल असा काळ निर्माण होण्याची शक्यता झाल्या झाल्या गांधीजींनी स्वतः घोषणा केली आहे, की 'माझ्या देहाचे तुकडे होतील पण माझ्या देशाचे तुकडे होऊ देणार नाही'. आणि स्वतः बापूजी असे म्हणत आहेत म्हटल्यावर लोक त्यांच्या मागे राहिले की गांधीजी एवढ्या तीव्रतेने सांगत आहेत, म्हणजे गांधीजींच्या मागे राहणे चांगले. म्हणून हिंदू महासभेचा पराभव झाला. काँग्रेस विजयी झाली. इतिहास आपल्या सर्वांना माहिती आहे. देशाचे दोन तुकडे झाले. आणि त्या वेळेला धडपडणारा हा माणूस देशभर दौरे करत होता.

आता परवा नागभूमीचा प्रश्न, आसामचा प्रश्न सुटला बघा मोदींच्या कारकिर्दीत. सावरकरांचे त्यावर वाक्य आहे, ''नागभूमीचा तो क्षुल्लक प्रश्न, माझे सरकार आले असते तर दोन दिवसांत सोडविला असता. दोन दिवसांत. क्षुल्लक प्रश्न आहे!'' म्हणजे यांचा आंतरराष्ट्रीय अभ्यास आणि प्रत्येक प्रश्नावरची दृष्टी प्रचंड होती. ''मला काही राष्ट्राध्यक्ष व्हायचा मोह नाही आहे, पण यदाकदाचित तुमच्यामुळे मी झालो असतो, तर माझ्या मंत्रीमंडळात संरक्षणमंत्री कधी नसता, आक्रमणमंत्री असता''.

रामदास स्वामींचा संदेश आहे. संभाजी महाराजांना लिहिलेले पत्र आहे ते. काय पत्र लिहिले आहे संभाजी महाराजांना?

*'आधी गाजवावे तडाखे । अवघे भूमंडळ धाके ।*
*ऐसे न होता धक्के । राज्यास बसती ।।'*

स्पष्ट शब्दात लिहिले आहे. 'आधी गाजवावे तडाखे'– म्हणजे 'अॅटॅक इज द बेस्ट डिफेन्स' हे ते लिहितात! 'अवघे भूमंडळ धाके' – तुम्ही तडाखे दाखवलेत की सगळ्या भूमंडळाला धाक बसलेला असतो. 'ऐसे न होता'– असे जर केले नाही, तर, 'धक्के राज्यास बसती'. म्हणून आपल्या देशाला कायम इकडे आतंकवादी आक्रमण, तिकडे आक्रमण, इकडून कसाब घुसला तिकडून अमका घुसला, तिकडे अफजल गुरू संसदेवर गेला, हे धक्के सातत्याने का बसत गेले? तर आम्ही कायम संरक्षणाचाच विचार करत राहिलेलो आहोत. 'तिकडून गोळी चालली तर आम्ही उत्तर देऊ' असे आमचे मंत्री म्हणत राहिलेले आहेत. सावरकरांचे मंत्री तसे म्हणाले नसते, तर त्यांच्याविरुद्ध काय करायचे याचा इतर देशांना विचार करायला लागला असता. आज इतक्या वर्षांनी सावरकरांच्या मागून देश चाललेला आहे आणि या सावरकरांना स्वीकारणे ही अतिशय गरजेची गोष्ट होती. पण नाकारल्याचे दुःखही त्यांना होते. जेव्हा नेहरूंनी झेंडावंदन केले ना, तेव्हाही सावरकरांना बोलावलेले नाही आहे बरं का! सावरकरांनी स्वतःच्या घरावर दोन झेंडे उभे केले. एक भगवा आणि एक तिरंगा. आणि तिथे स्वातंत्र्यदिन साजरा केला. माझा तीन–चतुर्थांश देश हा मुक्त

झाला ही सगळ्यात आनंदाची गोष्ट आहे. म्हणून स्वतःच्या घरी स्वातंत्र्यदिन साजरा केला.

स्वातंत्र्यानंतरसुद्धा या देशभक्ताला दोनदा अटक झाली. एकदा गांधीवधानंतर झाली. आणि त्यानंतर एकदा तर फारच कळस. पन्नास साली तो लियाकत अली नावाचा पाकिस्तानचा पंतप्रधान येणार, म्हणून सावरकरांना पकडले होते, आणि बेळगावच्या हिंदलगा जेलमध्ये टाकले होते. का? सुरक्षिततेच्या कारणासाठी. म्हणजे देश म्हणून आपण सगळे त्यांच्याविषयी किती कृतज्ञ राहिलो हा सगळा चिंतनाचाच विषय आहे. तसे असूनसुद्धा यांची देशभक्ती तसूभरसुद्धा कमी झाली नाही.

हृदयनाथ मंगेशकर यांनी सांगितलेला एक प्रसंग सांगतो, आणि मी माझ्या भाषणाच्या शेवटाकडे येतो. मंगेशकरांनी सावरकरांच्या सहवासात भरपूर आयुष्य काढलेले आहे. त्यांनी स्वतः सांगितलेला प्रसंग. ''तात्यारावांना इच्छा होती, की महाराष्ट्राची विधानसभा बांधून झाली होती तर ती बघावी. अर्थात, ती बघावी म्हणजे कसे, की या लोकांनी (सरकारने) बोलवावे आणि आपण बघावे. पण त्यांना कोणी काही बोलावले नाही. पण आमच्या डोक्यात ते होते, म्हणून आम्ही एक दिवस लता मंगेशकरांची गाडी घेतली, आणि तात्यारावांना त्या गाडीत बसविले आणि तिकडे नेले. आणि त्या इमारतीजवळून जाताना आम्ही सांगितले की आले बरं का हे विधान भवन! सावरकर म्हणाले, ''झाले माझे समाधान! आणि आता समुद्राकाठी चला.'' आम्ही त्यांना समुद्राकाठी घेऊन गेलो. तेव्हा एवढी गर्दी नव्हती मुंबईत. असे निवांत फिरता यायचे. आम्ही समुद्राकाठी जाऊन बसलो. बसताना आम्ही तात्यांना जरा मागे बसविले. अतिशय कृश झाले होते. शरीरात तेवढे त्राण नव्हते त्यांच्या, आणि आधीच प्रचंड हाल सहन केलेले असे ते शरीर आहे, तो देह आहे. आणि पाणी त्यांच्यावर उडू नये या पद्धतीने आम्ही जरा त्यांच्या समोर आडवे बसलो, तर त्यांनी सांगितले की, 'तुम्ही इथून थोडे बाजूला सरका. माझ्या अंगावर मला लाट आली पाहिजे.' आणि ते आणखी पुढे जाऊन बसले. आणि ते दहा-पंधरा मिनिटे सूर्याकडे बघत बसले आणि पुन्हा बोलावले आणि सांगितले की ''आता तुम्ही घरी निघून जा, मी असाच या समुद्रात निघून जाणार आहे!'' तेव्हा बरोबरचे दचकले. आणि ते म्हणाले की ''तात्या, तुम्ही जाल तर लोक आम्हाला फाशी देतील. आमच्याबरोबर तुम्ही आला आहात. आमच्या जबाबदारीवर आला आहात, तेव्हा गाडीत बसा'' मग आम्ही त्यांना गाडीत बसविले आणि घरी आणले.''

आणि त्यानंतर त्यांचे चिंतन असेच चालू होते, की 'हा देह जर उपयोगी राहिला नाही, तर शेवटी हा किती दिवस सांभाळायचा? तो इतरांना त्रास देणाराच ठरेल. कारण आता पुन्हा आपण काही तरुण होणार नाही.' आणि म्हणून मनाची तयारी करून एक फेब्रुवारी १९६६ पासून त्यांनी अन्नपाणी वर्ज्य केले.

आपल्याला दिलेली जबाबदारी, तीसुद्धा आपण याबरोबर आठवायची आहे बरं का, कारण पाकिस्तान आणि बांगलादेश असा देश खंडित स्वरूपात स्वतंत्र झाला आहे. आणि तो आपल्याला अजूनही त्रास देत आहे. तो आपल्याला एक करायचा आहे 'हिंदुनृसिंहा प्रभो शिवाजीराजा' हे गाणे तुम्ही सगळ्यांनी ऐकले आहे. त्यात एक कडवे घातलेले नाही आहे. ते कडवे बाजूला आहे. त्यात ते म्हणतात,

*''हा भग्न तट असे गडागडांचा आजी ।*
*हा भग्न आज जयदुर्ग आंसवांमाजी ।*
*ही भवानिची ह्या पुन्हा गंजली धारा ।*
*ती म्हणूनि भवानी दे न कुणा आधारा ।*
*गडकोट जंजिरे सारे- भंगले ।*
*जाहलीं राजधान्यांचीं-जंगले । परदास्य-पराभविं सारी - मंगले ।*
*या जगतिं जगू ही आज गमतसे लज्जा ।*
*हे हिंदु-नृसिंहा प्रभो शिवाजीराजा ।''*

आपला अभिमान खच्ची व्हावा म्हणून इंग्रजांनी पाडले ते अभिमानाचे किल्ले स्वातंत्र्यातसुद्धा अजून आपण परत बांधलेले नाहीत, ते आपण निर्माण केले पाहिजेत. बाहेर करता येत नाही तर आपल्या सद्गुरूंनी इथे शिवसमर्थगड निर्माण केला. हा आपल्या दृष्टीने अभिमानाचा विषय आहे. आणि तो किल्ला बांधल्यानंतर ही सगळी सृष्टी निर्माण झाली आहे बरं का! म्हणजे हे किती प्रेरणादायी स्थान आहे, हे आपल्या सर्वांच्या लक्षात आले असेल. आणि हे चरित्र अभ्यासण्यासारखे आहे. आणि ते सावरकरांचे म्हणणे पुढे नेण्यासारखे आहे. संपूर्ण हिंदुस्थान पुन्हा अखंड करणे आणि त्याला ग्रासणारी जी ही समस्या आहे, आता दिल्लीपासून, ती नष्ट करणे हे आपल्याला उरलेले दायित्व सावरकरांनी दिलेले आहे. त्यांचे अनुयायी म्हणविणार असू, तर हे स्वप्न जगत आपण राहिले पाहिजे, आणि ते पुढच्या पिढीकडे दिले पाहिजे, तर त्यांना आठवण्याचा मतलब आहे. मघाशी सांगितलेली सर्व ऋणे सावरकरांनी फेडली. मातृऋण, पितृऋण फेडले, समाजाचे ऋण फेडले, देशाचे ऋण फेडले. आता शरीर चालत नाही म्हटल्यावर या शरीराचा निरोप घ्यायचा, म्हणून अन्नपाणी एक फेब्रुवारी १९६६ ला वर्ज्य केले, आणि सव्वीस तारखेला 'धन्योऽहं, धन्योऽहं' म्हणून जगाचा निरोप घेतला. स्वतःच्या देहाला पायपूस मानून जगावे असा भिडे गुरुजींचा एक श्लोक आहे.

*'देहास मानुनी जगा नित पायपोस ।*
*झुंजा अखंड करण्या आपला स्वदेश।*
*होऊ नका चुकुर हे हृद्गत कथोनी ।*
*संदेश अंतीम दिला शिवभूपतीनी ।'*

असा त्यांनी निरोप घेतला आहे. आणि त्यांचे शब्द पण तसे आहेत. ते म्हणतात, की या देहाला विद्युतदाहिनीत झोकून द्या. काय शब्द वापरला आहे? झोकून द्या विद्युतदाहिनीत. फार लाड करत बसू नका. एवढा देशाकरिता स्वत:ला अर्पण करणारा असा हा खऱ्या अर्थाने अतिशय पुण्यवान पुरुष हा आपल्या देशात संपूर्ण कारकीर्द करून गेला, आणि त्याचे स्मारक आपल्या इथे आहे, आणि आज त्यांचा हा जो आत्मार्पण दिन आहे, हा आपण सर्वांच्या साक्षीने, महाराजांच्या आशीर्वादाने इथे साजरा करत आहोत. मलाही स्वत:ला धन्य झाल्यागत वाटत आहे, आणि म्हणून ती धन्यता व्यक्त करीत, आपण शांतपणे ऐकून घेतल्याबद्दल, आपल्या सर्वांचे आभार व्यक्त करून मी माझ्या वाणीला विराम देतो आहे.

।।श्री सद्गुरू सहजानंद सरस्वती
स्वामी समर्थ महाराज की जय।।



*स्वातंत्र्यवीर लोकमान्य टिळक यांना अभिवादन करताना श्री. प्रसाद चाफेकर*

# लोकमान्य टिळक या विषयावर व्याख्यान

## व्याख्याते : श्री. प्रसाद चाफेकर

**सोमवार, दि. ०९ मार्च २०२०**

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने इतिहासाची जाण व्हावी म्हणून दोन शिल्पे उभी केलेली आहेत. एक सावरकर यांचे आणि एक लोकमान्य टिळक यांचे. महाराष्ट्रात अशी शिल्पे कुठेही नाहीत. खरोखरच, शासनानेदेखील दखल घ्यावीत अशी शिल्पे उभी केलेली आहेत.

आजचा विषय आहे स्वराज्यपुरस्कर्ते लोकमान्य! लोकमान्य टिळकांचे आता स्मृतिशताब्दी वर्ष चालू आहे. दि. १ ऑगस्ट २०20 रोजी लोकमान्य टिळकांना जाऊन १०० वर्षे पूर्ण होतील. स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने लोकमान्य टिळकांच्या जीवनावर चरित्रगाथा असा हा कार्यक्रम आहे.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये अनेक धोरणं आणि अनेक नेत्यांनी आपले योगदान दिले. या १८५७ च्या स्वातंत्र्यसमरापासून ते पुढे १९४७ साली आपल्या भारताला जे स्वातंत्र्य मिळालं तोपर्यंत आपल्या स्वातंत्र्यासाठी, आपल्या स्वराज्यासाठी झगडणारी क्रांतीकारक नेतेमंडळी या आपल्या भारताला मिळाली. आणि या पुढाऱ्यांमध्ये एक अग्रगण्य असं नाव म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक! दि. २३ जूलै १८५६ चा टिळकांचा जन्म. तो रत्नागिरीचा. पाळण्यातलं नाव म्हणजे केशव. अर्थात थोरल्या बहिणी 'बाळ, बाळ' अशी हाक मारायच्या लाडाने आणि पुढे बाळ हेच नाव घरात आणि नंतर तेच सगळीकडे रूढ झालं.

वडील गंगाधरपंत हे शिक्षक होते. त्यांची आई पार्वतीबाई ह्या दिसायला अतिशय नाजूक होत्या, आणि तेवढ्याच त्या अशक्त होत्या. आणि या अशक्त असलेल्या पार्वतीबाईंच्या पोटी रत्नागिरीत मधल्या आळीतल्या सदोबा गोरेंच्या वाड्यामध्ये एका अशक्त मुलाचा जन्म झाला. भविष्यामध्ये संपूर्ण राष्ट्राला सशक्त करणारा बाळ गंगाधर टिळक! वडील शिक्षक होते, मुलगा पुढे लोकशिक्षक




*श्री. प्रसाद चाफेकर दीप प्रज्वलित करताना*

झाला. वडील शिक्षक म्हणजेच गुरू होते. मुलगा राष्ट्रगुरू झाला. आणि इतका महत्तेचा राष्ट्रगुरू की स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'गुरुणां गुरु' अशी उपाधी दिली म्हणजे गुरूंचा गुरू. वडील गंगाधरपंत हे रत्नागिरी मधल्या आळीतील मराठी शाळेचे मुख्याध्यापक होते.

१८६६ मध्ये म्हणजे बाळचे वय हे त्या वेळेला १० वर्षांचं होतं. त्यांना म्हणजेच गंगाधरपंतांना 'शिक्षण निरीक्षक' या पदावर बढती मिळाली आणि त्यांची बदली पुण्याला झाली. त्या बढतीमुळे सगळा टिळक परिवार पुढे पुण्याला आला. मग पुण्याच्या 'सिटी स्कूल'मध्ये ह्या बाळचा प्रवेश झाला. परंतु पुण्यात राहायला आले आणि लगेचच काही दिवसांमध्येच बाळची आई पार्वतीबाई यांचं अचानक अल्पशा आजारानं निधन झालं. म्हणून गंगाधरपंतांनी बाळला त्याच्या मामाकडे सुपूर्त केलं. मग मामा, मावशी, आत्या, काका अशी काही जवळची मंडळी होती, त्यांनीच बाळचं चांगलं संगोपन केलं. त्यांला आईची उणीव भासू दिली नाही.

बाळला अभ्यासामध्ये विशेष गती होती. अतिशय बुद्धिमान असा बाळ होता. पण तेवढाच बाणेदारपणा अंगामध्ये होता. प्राथमिक शाळेमध्ये शिकत असताना शेवटच्या वर्गामध्ये असतानाची जी कथा आहे, जी आपण १ ऑगस्टला टिळक पुण्यतिथी निमित्ताने विद्यार्थी सांगत असता, त्यामुळे सर्वांनाच माहीत असलेली भुईमुगाच्या शेंगांची कथा. त्याचा उत्तरार्ध असा आहे–गंगाधरपंत हे शाळेचे मुख्याध्यापक, त्यामुळे शिक्षकांनी त्यांच्याकडे दुसऱ्या दिवशी तक्रार केली. तर गंगाधरपंताना माहीत होतं आपला मुलगा कसा आहे तो. ते काहीही चौकशी न करता त्या शिक्षकाला म्हणाले की बाळ कधीही खोटं बोलत नाही. आणि बाहेरचं तो कधीही खात नाही. त्यामुळे शाळेची स्वच्छता आणि शिस्त तो कधीही मोडणार नाही. म्हणजे वडिलांना सुद्धा किती आत्मविश्वास होता आपल्या मुलाबद्दल!

गणित हा विषय बाळच्या अत्यंत आवडीचा. म्हणजे शिक्षकांनी टिळकांना एखादं गणित सोडवायला दिलं की, बाळ त्या गणिताचं उत्तर ताबडतोब व अचूक लिहून दाखवायचा. हे पाहून शिक्षक थक्क व्हायचे. इतर विद्यार्थी एक गणित सोडवायला पाच-पाच, दहा-दहा मिनिटे लावतात आणि हा एकटाच लगेच गणित सोडवून कसा दाखवतो? काय हा प्रकार? किती हुशारी आहे या मुलाची! ते थक्क व्हायचे. पण, टिळकांचे फक्त गणितच नाही तर संस्कृत आणि इतिहास हेदेखील आवडते विषय होते. आणि त्यांचे त्यांच्या विषयशिक्षकांसोबत त्या विषयासंबंधी वादही व्हायचे. म्हणजे यावरून त्या विषयाचे किती सखोल ज्ञान विद्यार्थीदशेमध्ये टिळकांना होतं हे लक्षात येतं. पुढे वयाच्या १५ व्या वर्षी बाळचा विवाह झाला. पूर्वी लवकर विवाह होत असत. त्या वेळी १७-१८ व्या वर्षी विवाह म्हणजे फार उशीर. बाळचा विवाह दापोलीजवळील लाडघर येथील बाळ घराण्यातील 'तापी' नावाच्या मुलीशी झाला. संसार सुरू झाला.

पण, दुर्देव असं की, वर्ष व्हायच्या आतच गंगाधरपंतांचं निधन झालं; परंतु त्यांनी बाळची सगळी सोय करून ठेवलेली होती. कोकणातील स्थावर मालमत्ता त्यांनी बाळच्या नावावर केली होती. एवढंच नाही तर त्या काळी त्यांनी बाळच्या नावावर कायम स्वरूपी ठेवीवर ५ हजार रुपये ठेवले होते. त्याकाळचे हे ५ हजार रुपये म्हणजे आताचे किमान ५० लाख रुपये. त्यामुळे पैशाची काही कमतरता नव्हती. आर्थिक स्थिती चांगली होती हे दिसून येते.

पुढे बाळने पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयात बी.ए.च्या शिक्षणासाठी कलाशाखेत प्रवेश घेतला. तिथे मग बाळचे बळवंतराव झाले. आणि बी.ए.मध्ये शिकत असताना या महाविद्यालयात त्यांना वामन आपटे, गोपाळ गणेश आगरकर, साठे यांसारखे विद्यार्थी मित्र भेटले. बी.ए.ला टिळकांचा गणित हा स्पेशल विषय होता. पुढे १८७६ मध्ये ते पदवीधर झाले. पुढे त्यांनी एल्‌एल्. बी. सुद्धा केले, कारण त्यांना कायद्याच्या विषयाची विशेष आवड होती. कायद्याचा अभ्यास करण्याची त्यांची इच्छा होती. या अभ्यासामुळेच त्यांना वेगवेगळ्या देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास जवळून करता आला. आणि ते १८८० मध्ये एल्‌एल्. बी. झाले एवढंच काय तर, त्यांना सनदही मिळाली.

टिळकांचं अजून एक वैशिष्ट्य म्हणजे कायद्याचे वर्ग पुढे त्यांनी २० वर्ष चालवले. जसे आज आपण इंजिनीअरिंगचे वगैरे क्लासेस बघतो त्याप्रमाणे, आणि ते क्लासेस उत्तम प्रकारे चालायचे. टिळकांना सनदही मिळालेली होती. म्हणजे वकिली करण्याची परवानगीही त्यांना मिळालेली होती. त्यांनी शासनाकडे 'असिस्टंट डेप्युटी जज' या पदासाठी अर्ज केला. त्यात त्यांची निवडही झाली. निवडीचं पत्रही आलं परंतु बळवंतराव तेथे गेले नाहीत कारण देशाला त्यांची ओळख 'न्यायमूर्ती' अशी व्हायची नव्हती तर 'लोकमान्य' अशी व्हायची होती.

अजून एक पुण्यातलं मोठं व शिक्षणशास्त्रातलं आघाडीचं व्यक्तिमत्त्व म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर. त्यांची त्या काळात निबंधमाला प्रसिद्ध झाली. त्या निबंधमालेचे ८० भाग प्रसिद्ध झाले. ते सरकारी शाळेत शिक्षक म्हणून काम करीत होते. पण, त्यांनी स्वतंत्र शाळा काढण्याचे ठरविले होते. त्यांनी १ जानेवारी १८८० ला पुण्यामध्ये मोरोदादा फडणवीस यांच्या वाड्यामध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली आणि या शाळेच्या पहिल्या दिवसापासून बळवंतराव टिळक विनावेतन या शाळेत रूजू झाले. त्या शाळेत आगरकरदेखील शिकवित होते. पुढच्याच वर्षी 'केसरी' आणि 'मराठा'सारखी वृत्तपत्रे सुरू करण्यात आली. आता केसरीची जबाबदारी आगरकरांवर तर मराठा वृत्तपत्राची जबाबदारी टिळकांवर

होती. दोघेही अत्यंत जवळचे मित्र होते. 'केसरी' हे वृत्तपत्र मराठीतून तर 'मराठा' हे वृत्तपत्र इंग्रजीमधून प्रकाशित व्हायचं आणि टिळकांचं इंग्रजीवर प्रभुत्व असल्याने 'मराठा' या वृत्तपत्राची जबाबदारी टिळकांवर होती. या दोन्ही वृत्तपत्रांचं काम उत्तम प्रकारे सुरू झालं. त्याच्यातले त्यांचे अग्रलेखही प्रसिद्ध होत होते.

सुरुवातीच्या काळामध्ये बळवंतरावांनी त्यांचे गुरू विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्याकडे तक्रार केली, कुरकुर केली की आम्हाला लिहिता येत नाही. विष्णुशास्त्री त्यांना म्हणाले, ''तुमचं अंतकरण देशासाठी तळमळतं ना?'' बळवंतराव म्हणाले, ''हो तळमळतं.'' ''मग तुम्हाला लिहिता आलंच पाहिजे.'' आणि तेव्हापासून त्यांचा जो लिहिण्यामागचा न्यूनगंड होता तो दूर झाला. परंतु त्यांचा सहवास फार काळ लाभला नाही. दि. १७ मार्च १८८२ ला विष्णुशास्त्री यांचे निधन झाले. पुढे पुण्यामध्ये 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'ची दि. २४ ऑक्टोबर १८८४ रोजी स्थापना झाली. या स्थापनेमध्ये न्यायमूर्ती रानडे होते. न्यायमूर्ती तेलंग होते. पुण्यातले डॉक्टर भांडारकर, मुंबईचे त्या वेळेचे गव्हर्नर जेम्स फर्ग्युसन होते. अशी संस्थापक मंडळी यांच्यामध्ये होती. टिळक व आगरकर आजीव सदस्यांमध्ये होते. आणि या 'डेक्कन एज्युकेशन'ची स्थापना झाली. स्थापना झाल्यानंतर जसा इंग्लिश शाळेला चांगला प्रतिसाद मिळू लागला होता, म्हणून विद्यार्थ्यांसाठी एखादं महाविद्यालयदेखील सुरू करावं अशी कल्पना पुढे आली आणि पुढे दि. २ जानेवारी १८८५ ला 'फर्ग्युसन कॉलेज'ची स्थापना झाली. त्यामध्ये टिळक हे गणिताचे प्राध्यापक झाले आणि आगरकर हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक झाले. टिळक नुसते गणितच शिकवत नव्हते तर संस्कृत विषयसुद्धा घेत होते. आपण इतिहास संशोधक गो. स. सरदेसाई हे नाव ऐकलं असेल, त्यांनी एक आठवण सांगितली प्राध्यापक टिळकांविषयी. ते विद्यार्थीदशेमध्ये असताना त्यांना टिळक शिकवत होते. त्यांनी असं सांगितलं, प्राध्यापक टिळक गणितामध्ये परम्युटेशन शिकवताना, दैनंदिन जीवनातील उदाहरणं देऊन तो विषय रसाळ बनवीत. त्यामुळे गणिताचा तास कसा संपायचा हे कळायचं देखील नाही. आम्हा विद्यार्थ्यांवर त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाची मोठी छाप होती असं सरदेसाई यांनी म्हटलंय. एवढंच नाही तर विद्यार्थ्यांच्या शंका सोडवण्यासाठी ते नेहमी तत्पर असत. कॉलेज सुटल्यावर विद्यार्थ्यांच्याबरोबर टिळक चालत घरी जायचे. त्यांच्याबरोबर वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करायचे. ही एक चांगली आठवण यांनी सांगितली आहे.

आता केसरी व मराठाचे काम उत्तम प्रकारे चालू होते. यांना लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. परंतु टिळक आणि आगरकर यांच्यामध्ये मतभेद होते हे आपल्या सर्वांना माहित आहे. आधी समाजसुधारणा की आधी राजकीय स्वातंत्र्य या विषयावरून दोघांमध्ये प्रचंड मतभेद होते. आगरकर यांचं म्हणणं होतं की अगोदर समाज सुधारला पाहिजे. समाज सुधारल्यानंतर आपोआप आपल्याला स्वातंत्र्य मिळेल. ते आत्ता मागायची गरज नाही. टिळकांचं म्हणणं असं होतं की आधी राजकीय स्वातंत्र्य महत्त्वाचे! समाजसुधारणा आपली आपण नंतर करू या आणि समाजसुधारणा करताना इंग्रजांचा त्यामध्ये हस्तक्षेप नको या मताचे बळवंतराव टिळक होते. हे दोन्ही मतभेद पराकोटीला गेले आणि शेवटी आगरकरांना केसरी सोडावा लागला. दि. २५ ऑक्टोबर १८८७ ला त्यांनी केसरीच्या संपादकपदाची जबाबदारी सोडली. वर्षभरातच त्यांनी आपलं सुधारक वर्तमानपत्र सुरू केलं. पुणे डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्ये वाद विकोपाला गेला. तिथेसुद्धा वैचारिक मतभेद. आता कुठले होते तर वेतनवाढीच्या करारावरून, पगार वाढवावा की नाही यावरून मतभेद होते. टिळकांची आर्थिक परिस्थिती चांगली होती, परंतु आगरकर मात्र दारिद्र्याशी झगडत होते. टिळकांचं म्हणणं असं होतं की जेसुइट ख्रिस्ती धर्मोपदेशक यांच्या मिशनरी वृत्तीप्रमाणे शाळा व महाविद्यालय चालवायला हवीत म्हणजे शिक्षकांनी विनावेतन शिकवायला हवं. ते स्वत: इंग्लिश स्कूलमध्ये शिकवत होते. परंतु आगरकरांचं म्हणणं होतं की वेतन वाढ व्हायला हवी कारण माणसाची परिस्थिती बोलत असते. त्यामुळे आगरकरांनी असा युक्तिवाद केला की जेसुइट लोकांनादेखील मुलंबाळं, घर संसार असतो. आणि तो वाद विकोपाला गेला. इतर मंडळी आगरकरांच्या बाजूने गेली, टिळक हे एकाकी पडले, आणि शेवटी संस्थेचा त्यांनी राजीनामा दिला. बळवंतरावांनी डेक्कन एज्युकेशनच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्या राजीनाम्याच्या पत्रामध्ये त्यांनी असं म्हटलं आहे की वाजवीपेक्षा अधिक काळ तुमच्या सहवासात राहून मला संस्थेचे आस्तित्व धोक्यात आणायचे नाही. असं म्हणून त्यांनी बाणेदारपणे तो राजीनामा दिला. आणि झालं ते टिळकांच्या दृष्टीने चांगलंच झालं. त्याचं कारण असं होतं की केसरी आणि मराठा वृत्तपत्राची त्यांच्यावर जबाबदारी होती. पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांना प्रवेश करता आला. आणि केसरी, मराठा यांच्या माध्यमातून त्यांचा जनतेशी अधिकाधिक संबंध येत गेला. तो इतका वाढत गेला की त्यांना लोकमान्यता मिळाली. 'लोकमान्य' ही पदवीदेखील त्यांना मिळाली. आता त्यांना 'लोकमान्य' कोणी म्हटलं? 'भाला'कार भोपटकारांनी त्यांना तसं संबोधलं की शिवरामपंत परांजपे यांनी हा मुद्दा गौण आहे. परंतु ते लोकमान्य झाले हे तितकंच खरं आहे. मग पुढे तीन चार वर्ष त्यांच्या प्रगतीचा काळ होता. मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर ते निवडून गेले. पुणे नगरपालिकेचे ते सदस्य झाले.

सन १८९५मध्ये न्यायमूर्ती रानडेंच्या इथे जी सार्वजनिक सभा झाली ती टिळकांनी आपल्याकडे खेचून आणली. हा सगळा प्रगतीचा काळ होता. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला.

त्यांच्या आयुष्यातली गणेशोत्सव, शिवजयंती उत्सव ही प्रामुख्याने महत्त्वाची कार्ये. सन १८९३ मध्ये हा गणेशोत्सव सुरू होण्याचे निमित्त होते मुंबईमध्ये हिंदू मुसलमानांमध्ये झालेली दंगल. त्यामुळे त्यांनी उत्सवांची सुरुवात केली. पुण्यामध्ये प्रथम सुरुवात केली. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी गणेशोत्सव व शिवजयंती उत्सवाची सुरुवात केली. सन १८९६ मध्ये शिवजयंती उत्सव सुरू केला. शिवाजीमहाराज लोकमान्य टिळकांचे दैवत होते. म्हणजे टिळक नेहमी म्हणायचे की थंड गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्राला उब देऊन चालायला शिकवले ते न्यायमूर्ती रानडेनी. परंतु लढायला शिकवले ते शिवाजीमहाराजांनी! आणि म्हणून पहिला शिवजयंती उत्सव सुरू केला तो रायगडावर दि. १५ एप्रिल १८९६ ला. त्याला लोकांनी अक्षरश: उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. टिळकांनी असे म्हटले की गणेशोत्सव किंवा शिवजयंती उत्सव हे मुसलमानांना डिवचण्यासाठी सुरू केले नाहीत तर हिंदू आणि मुसलमानांमध्ये धार्मिक ऐक्याचं वातारण निर्माण व्हावं, प्रेम भावनेचं वातावरण निर्माण व्हावं म्हणून हे उत्सव सुरू केले.

लक्षात घ्या, काही ठिकाणी शिवजयंती उत्सव काय किंवा गणेशोत्सव काय बरीचशी मुसलमान मंडळी या उत्सवामध्ये सहभागी होताना दिसतात. टिळकांचा या पाठीमागचा उद्देश होता तो तितकाच योग्य आणि अचूक होता. दि. २२ जून १८९७ रोजी दामोदरपंत चाफेकरांनी पुण्यामध्ये त्या वेळचा जुलमी ब्रिटिश अधिकारी रँन्ड याचा वध केला. पुण्यामधले गव्हन्र्मेंट हाऊस ते गणेशखिंड यामधला जो भाग आहे त्या मार्गावर रँन्ड याच्यावर गोळ्या झाडल्या आणि ते म्हणाले की गणेशखिंडीतील गणपती पावला. टिळक त्या वेळेला अडक्त्याने सुपारी कातरून खायचे. साठे निरोप घेऊन आले तेव्हा ते सुपारी कातरत होते. त्यांनी हुशारीने उत्तर दिलं (सांकेतिक भाषेत), ''असं का? वा, छान झाले! आता हुशारीने वागा. नीट काळजी घ्या'' आणि त्याच सुमाराला केसरी वर्तमानपत्रातून टिळकांचे दोन अग्रलेख प्रसिद्ध झाले. त्यांच्यातील एक अग्रलेख होता, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' दुसरा होता 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे!'. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' हा दि. ६ जुलै १८९७ चा अग्रलेख केसरीमधला. तो लिहायचे कारण म्हणजे प्लेगची साथ आली होती आणि त्यातच ब्रिटिशांचा पुण्यात इतका अत्याचार सुरू होता जनतेवर! तुम्ही तो चित्रपट पाहिला असेल '२२ जून १८९७'! उंदरांकडून प्लेग पसरला जातो आहे अशी शंका होती. ब्रिटिश सोल्जर घरोघरी जाऊन ते उंदीर हुडकण्यासाठी घरातले सामान बाहेर फेकून द्यायचे. कपडे जाळायचे. एवढेच नव्हे तर चप्पल-बूट घालून ते सोल्जर देवघरापर्यंत पोहोचले. हे सर्व बघून टिळकांनी विचारले की 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' या दोन अग्रलेखांचं निमित्त करून ब्रिटिशांनी त्यांना अटक केली आणि येरवड्याच्या कारागृहात त्यांना ठेवले.

पुढे दामोदरपंत चाफेकर हे रँन्डच्या खुनात पकडले गेले. त्यांनादेखील याच येरवड्याच्या कारागृहात ठेवले गेले. एक दिवस दामोदरपंत चाफेकर टिळकांना भेटायला आले आणि त्यांनी त्यांच्या शिक्षेविरुद्ध अपिल लिहून देण्यास सांगितले; कारण लोकमान्य टिळक यांना वकिलीची सनद मिळाली होती. त्यांनी अपिल लिहून दिले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. पुढे दामोदरपंत चाफेकरांना फाशीची शिक्षा जाहीर झाली आणि त्यानंतर पुन्हा एकदा दामोदरपंत टिळकांना भेटण्यासाठी आले आणि त्यांनी त्यांना विनंती केली, ''तुमच्याजवळची 'भगवद्गीता' मला द्या. लवकरच मला फाशीची शिक्षा होणार आहे. त्यामुळे तुम्ही माझ्याजवळ शेवटपर्यंत आहात या माझ्या समाधानासाठी ही तुमची 'भगवद्गीता' माझ्याजवळ द्या.'' भगवद्गीतेचा आदर्श त्यांच्या डोळ्यासमोर होता. त्यामुळे त्यांच्याजवळ कायम 'भगवद्गीता' असे.

टिळकांनी लगेच भगवद्गीतेची प्रत दामोदरपंताना काढून दिली आणि ती प्रत हातामध्ये घेऊन दि. १८ एप्रिल १८९८ ला दामोदरपंत हे फाशी गेले. टिळकांनादेखील त्या दिवशी आपले अश्रू आवरता आले नाही. टिळकांच्या जीवनामध्ये दुःखाश्रू ढाळण्याचा प्रसंग हा फार क्वचित घडला. त्यांची पत्नी गेली, मुलगा गेला, तेव्हादेखील त्यांनी त्यांच्या अश्रूंना कह्यात ठेवलं होतं कारण, गीतेच्या अभ्यासामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक प्रकारची स्थितप्रज्ञता होती. परंतु ह्या स्थितप्रज्ञतेचे अश्रू दोन वेळा बंड करून उठले. एकदा त्यांचे परममित्र आगरकर गेल्यानंतर त्यांच्यावरचा मृत्युलेख ते केसरीसाठी आपल्या लेखनिकाला सांगत होते त्या वेळेला आणि दुसरं म्हणजे दामोदरपंत चाफेकर जेव्हा फाशी गेले त्यावेळी.

आपल्या या भारत देशामध्ये कृषिक्रांतीचा अग्रदूत म्हणून महात्मा फुलेंचं स्थान अढळ आहे. महात्मा फुल्यांनंतर शेतकऱ्यांना संघटित करण्याचं काम टिळकांनी केलं. सन १८९३मध्ये जेव्हा काँग्रेसचं अधिवेशन झालं त्या अधिवेशनामध्ये ते म्हणाले, ''काँग्रेस ही फक्त जमीनदारांचीच नाही, तर शेतकऱ्यांची पण आहे.'' सन १८९५मध्ये पुण्यामध्ये अधिवेशन झालं तेव्हादेखील त्यांनी तेच सांगितलं. हे झालं शेतकऱ्यांबद्दलचं धोरण. कामगारांबद्दलचं धोरण काय होतं? भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक भाई डांगे यांनी एक पुस्तक प्रसिद्ध केलं होतं, 'क्रांतिकारक कामगार आणि लोकमान्य टिळक'. त्या पुस्तिकेमध्ये मुंबईतल्या गिरणी कामगारांना गिरणीमालकांच्या विरोधात उभं करण्याचा पहिला मान त्यांनी लोकमान्य टिळकांना दिला होता.

त्या वेळी कामगार मंडळी निषेध व्यक्त करण्यासाठी काय करायचे तर, प्लेग होता त्याकाळी. ती प्लेग प्रतिबंध लस टोचून घ्यायला ही कामगार मंडळी नकार द्यायची. ताप यायचा त्या तापावर




*श्री. प्रसाद चाफेकर व्याख्यान देताना*

गोळ्या घ्यायला नकार द्यायची तेव्हा डांगे त्यांचेकडे औषध घेऊन जायचे आणि त्यांना खोटं सांगायचे की आम्ही टिळकमहाराजांकडून आलो आहोत आणि त्यांनी ही औषधं दिलीत आणि तुम्हांला घ्यायला सांगितलीत तेव्हा ती कामगार मंडळी टिळकांचं नाव घेतल्यावर औषधे घ्यायची. एवढे टिळक त्यांच्या दृष्टीने दैवत होते.

इंग्लडला आंतरराष्ट्रीय कामगार परिषद झाली. त्या परिषदेसाठी भारताचे प्रतिनिधी म्हणून कामगार संघटनांच्या माध्यमातून टिळकांची निवड केली. त्यानिमित्त लोकमान्यांचे ठिकठिकाणी सत्कार झाले. मद्रासमध्ये जेव्हा त्यांचा सत्कार झाला त्या ठिकाणी ते काय म्हणाले बघा. ''लोकशाहीवाद्याला मी पक्का लोकशाहीवादी आहे. तुमचा प्रतिनिधी म्हणून घेणे हा मी माझा सन्मान समजतो. कामगार चळवळ ही देशाच्या उन्नतीसाठीच आहे. आणि आपल्या देशामध्ये तिने मूळ धरलेलं आहे. भविष्यामध्ये कोणत्याही मुत्सद्याला त्याची गळचेपी करता येणं शक्य नाही.'' सन १८९५मध्ये पुण्याला काँग्रेसचं अधिवेशन झालं त्याच्यावर त्या वेळच्या सनातनी-सुधारक या मंडळींच्या संघर्षाची छाया पडली. दोघांमध्ये प्रचंड संघर्ष होता. पण ते अधिवेशन यशस्वी व्हावं यासाठी टिळकांनी या दोन्ही मंडळींना आवाहन केलं की, एकत्र या, आपआपसात वाद घालू नका, भांडू नका. ते असं म्हणाले की पुण्यातलं अधिवेशन ही अखेर जनतेची परिषद व्हावी. त्यासाठी त्यांनी मराठामध्ये अग्रलेख लिहिला व असं म्हटलं की काँग्रेस ही केवळ जमीनदारांची नसून शेतकरी, कामगार या सर्वांची आहे आणि काँग्रेस मंडळ हे विशिष्ट वर्गाच्या मर्यादेत न राहता भविष्यात आम जनतेसाठी काँग्रेसची दारं खुली केली पाहिजेत, हे 'मराठा'च्या लेखातून टिळकांनी लिहिलं. म्हणजे केसरी आणि मराठाच्या माध्यमातून समाजजागृतीसाठी, लोकजागृतीसाठी टिळकांच्या अग्रलेखांची तोफ अक्षरशः धडाडत होती.

सन १८९९ चा 'पुनश्च हरिओम'सारखा अग्रलेख टिळकांनी लिहिला. म्हणजे येरवड्याच्या कारागृहातून सुटका झाल्यानंतर नऊ-दहा महिन्यांनी हा अग्रलेख लिहिला. पुन्हा काँग्रेसच्या राजकारणामध्ये सुरवात केली. पुढे १९०० साली दिल्लीचं अधिवेशन झालं, त्यानंतर कलकत्याचं अधिवेशन झालं, त्या वेळेला महात्मा गांधी व लोकमान्य एकत्र आले. या दोघांमध्ये वैचारिक मतभेद



*श्रोतृवर्ग*

नव्हते, समन्वय होता हे सांगणं अतिशय गरजेचं आहे. पुढे सन १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली.

बंगालच्या फाळणीमुळे टिळकांचं नेतृत्व मुंबई, महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून देशपातळीवर जाऊन पोहोचलं हे लक्षात घ्या. बंगालची फाळणी झाली १९०५ ला, पुढे ती १९११ मध्ये रद्द करण्यात आली. टिळक मंडालेला कारावास भोगण्यासाठी १९०८ मध्ये गेले. तेथे ते १९०८ ते १९१४ असे ६ वर्ष होते. त्यामुळे बंगालसाठी टिळकांना तीन वर्षं मिळाली १९०५ ते १९०८. परंतु या तीन वर्षांमध्ये त्यांनी खऱ्या अर्थाने बंगाल्यांची मनं जिंकली.

आता नेमके काय झाले या फाळणीच्या वेळेला? दि. ७ ऑगस्ट १९०५ ला कलकत्ता शहर पेटून उठले. विद्यार्थी सकाळपासून 'वंदे मातरम्'च्या घोषणा देत घोळक्याने रस्त्याने फिरायला लागले. बंगालमधली जनता एकत्र यावी आणि त्यांनी बंगालची फाळणी रद्द करावी अशा ते घोषणा देऊ लागले. दुपारी दोन वाजल्यापासून कलकत्त्यात हरताळाला सुरवात झाली. रात्री कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्ये प्रचंड जनसमुदाय एकत्र आला. जनसमुदाय अतिशय संतापलेला होता. परंतु हातामध्ये शस्त्र मात्र नव्हती. पण एकीकडे बंदुकधारी पोलीस होते. म्हणजे अशी भीषण परिस्थिती होती, भयंकर परिस्थिती होती; परंतु ही अतिशय भयंकर आणि कठीण परिस्थिती सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी अतिशय कौशल्याने हाताळली. या जनसमुदायाला त्यांनी एक प्रभावी पर्याय दिला. तो म्हणजे बहिष्काराचा! कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी बहिष्काराची घोषणा केली. ती अल्पावधीतच पुण्यातल्या विंचुरकर वाड्यापर्यंत पोहोचली. त्याचे कारण त्या वेळेला टिळक पुण्यामध्ये विंचुरकर वाड्यावर निवासस्थानाला होते.आणि टिळकांनीदेखील त्याला प्रतिसाद दिला.

पुढे त्यांनी आवाहन केले की, बहिष्काराची चळवळ आपण उचलून धरली पाहिजे आणि देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत ही चळवळ पोहोचवली पाहिजे. आणि तसा प्रयत्न त्या वेळी केसरीने केला. एवढेच नाही तर शिवरामपंत परांजपे यांचे 'काळ' हे वर्तमानपत्र होते. त्या 'काळ'ने देखील तसा प्रयत्न केला. पुढे दोन महिन्यांनीच म्हणजे दि. ७ ऑक्टोबर १९०५ ला सावरकरांनी पुण्यामध्ये विदेशी कपड्यांची होळी केली. लोकमान्य टिळक आणि शिवरामपंत परांजपे यांच्या साक्षीने ती होळी केली. त्या होळीच्या दिवशी शिवरामपंत परांजपे तर अक्षरश: पेटून उठले होते. त्यांनी आपल्या अंगावरील विदेशी कापडाचा कोट काढला आणि त्या होळीत जाळून टाकला. त्या दिवशी त्यांचंदेखील एक ज्वालाग्रही असं भाषण झालं आणि त्यानंतर मग टिळकांचे दौरे सुरू झाले.

त्या अगोदर १९०६ साली कलकत्त्याला फार महत्त्वाचे अधिवेशन झाले. त्या अधिवेशनाला टिळक उपस्थित राहिले. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते दादाभाई नौरोजी. आता तिसऱ्यांदा ते काँग्रेसचे अध्यक्ष होत होते. परंतु टिळकांनी त्यांना मनापासून पाठिंबा

दिला कारण दादाभाईंची योग्यता ते जाणून होते. त्या अधिवेशनात दादाभाईंनी देशाला एक संदेश दिला, मंत्र दिला तो म्हणजे 'स्वराज्य'. पुढे टिळकांनी या मंत्राचे चिरंजीव असे सुभाषित केले. ते म्हणजे 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच!' या अधिवेशनाला टिळक उपस्थित राहिले होते. ते रेल्वेने गेले आणि जेव्हा कलकत्त्याला हावडा रेल्वेस्थानकावर उतरले तेव्हा ती मंडळी अक्षरश: त्यांची वाट बघत होती. जेव्हा टिळक रेल्वेतून उतरले तेव्हा त्यांना घेण्यासाठी एक घोडे जोडलेली बग्गी आली होती. त्या बंगाली मंडळींनी ते घोडे बाजूला सोडले आणि स्वयंसेवकांनी बग्गी काही अंतरापर्यंत ओढत नेली. काय प्रेम होते बघा! त्यानिमित्ताने टिळकांची काही ठिकाणी भाषणं झाली.

पुढे मग त्यांनी नागपूर आणि वऱ्हाडचा दौरा केला. नागपुरकरांचं त्यांच्यावर एवढं प्रेम की, टिळक जेव्हा नागपूरला गेले तेव्हा नागपूरकरांनी बळवंतराव टिळकांना काँग्रेसचा अध्यक्ष करायचे ठरवले. तसा त्यांनी विडाच उचलला. एवढेच नाही तर ते अधिवेशन नागपूरलाच बोलवायचे असे त्या मंडळींनी ठरवले. त्यासाठी टाऊन हॉलमध्ये स्वागत समितीची बैठक झाली. त्याला पुन्हा जहाल आणि मवाळ दोन्ही मंडळी उपस्थित होती. परंतु त्या बैठकीमध्ये प्रचंड मोठा गदारोळ झाला. जहाल व मवाळ मंडळींचं जरा देखील पटायचं नाही. प्रचंड गदारोळ झाला, मतभेद झाले, खुर्च्यांची फेकाफेक झाली, एकमेकांना शिव्या दिल्या गेल्या. त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. पण त्यातून ठरले असे की, काँग्रेसचे अधिवेशन हे सुरतला घ्यायचे. सुरतसाठी जहाल मंडळींनी लगेच लाला लजपतराय यांचे नाव सुचवले. लाला लजपतराय यांना काँग्रेसचे अध्यक्ष करण्यात आले पण तेदेखील नाकारण्यात आले. कारण रासबिहारी बोस यांना काँग्रेसचे अध्यक्ष करण्याचे ठरवले. त्यालादेखील लोकमान्य टिळक आणि लाला लजपतराय यांनी मनापासून पाठिंबा दिला.

सुरतचे अधिवेशन १९०७मध्ये भरले. त्या अधिवेशनात जहाल आणि मवाळ मंडळींचे प्रचंड मतभेद झाले. प्रचंड मोठा गदारोळ झाला. दोन्ही बाजूंनी खुर्च्यांची फेकाफेक झाली. एकमेकांच्या अंगावर जोडे फेकले गेले. अक्षरश: हाणामारी झाली. मग सुरतचे अधिवेशन उधळले गेले. काँग्रेसच्या त्यापूर्वीच्या बावीस वर्षांच्या इतिहासात असे कधीही घडले नव्हते. ते त्या सुरतच्या अधिवेशनात घडले. खरं तर तो त्यांना कलंक होता.

नंतर मवाळ मंडळींनी त्या जहाल मंडळींची काँग्रेसमधून हकालपट्टी केली. तरीदेखील टिळकांना असे वाटत होते की, अजूनही विसरा आणि क्षमा करा या वृत्तीने वागण्याची आमची तयारी आहे. टिळकांनी शेवटचा प्रयत्न म्हणून दोन अटी घातल्या. त्यांची एक चतु:सुत्री होती. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण यावरचे गेल्या अधिवेशनातील जे ठराव होते ते या अधिवेशनात देखील कायम करण्यात यावेत. त्या प्रत्येकाचा या अधिवेशनात स्पष्टपणे पुनरुच्चार करण्यात यावा अशी अट टिळकांनी घातली. काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या वादात पुढे ते म्हणाले, जहाल मंडळी म्हणजे राष्ट्रवादी गट आहे. त्याला लागेल असं काही बोललं गेलं तर तो भाग कामकाजातून काढून टाकण्यात यावा. या दोन अटी टिळकांनी घातल्या. पण या साध्या अटीदेखील ही मवाळ मंडळी मान्य करायला तयार नव्हती.

शेवटी अरविंद घोष टिळकांना म्हणाले की नवीन स्वतंत्र अधिवेशन बोलवा. पण टिळकांनी त्याला मान्यता दिली नाही. नकार दिला. त्याचं कारण परत तेच की त्यांना काँग्रेस फोडायची नव्हती. कोणत्याही कारणाने काँग्रेस फुटता कामा नये. टिळकांना वाटत होते की, काँग्रेस ही त्यामध्ये काम करणाऱ्या पुढाऱ्यांनी म्हणजेच जनतेने मोठी केली आहे. त्यामुळे कोणत्याही कारणाने काँग्रेस फुटू नये या मताचे टिळक होते म्हणून त्यांनी याला नकार दिला.

सन १९०८मध्ये टिळकांचे दोन अग्रलेख 'हे देशाचे दुर्दैव' आणि 'हे उपाय टिकावू नव्हेत' केसरीत प्रसिद्ध झाले. त्या वेळेला इंग्रजांची भारतीय जनतेवरची दडपशाही अतिशय वाढलेली होती. या दोन अग्रलेखांचा आधार घेऊन ब्रिटिशांनी टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली. दि.२४ जून १९०८ ला प्रत्यक्षात अटक झाली.

दि. २ जुलैला बॅरिस्टर मोहम्मद अली जिना यांनी टिळकांच्यावतीने जामिनासाठी अर्ज केला. त्यापूर्वी हा अभियोग ज्यांच्यासमोर चालणार होता त्या न्यायमूर्ती दावर यांचे चिरंजीव बॅरिस्टर दावर हे टिळकांचे वकील झाले होते. त्यांनीही टिळकांच्या वतीने जामिनासाठी अर्ज केला होता. त्यांचा व जिनांचा असे दोन्ही अर्ज फेटाळण्यात आले. शेवटी टिळकांनी स्वत:वरचा अभियोग स्वत:च लढायचे ठरवले. त्यांच्या मदतीला दादासाहेब खापर्डे आणि दादासाहेब करंदीकर हे चांगले वकील होते. जोसेफ बॅप्टिस्टा, बापूसाहेब गांधी अशी विदर्भातील विधिज्ञ मंडळी त्यांच्या मदतीला आली आणि प्रत्यक्षात दि. १३ जुलै १९०८ला हा अभियोग सुरू झाला. टिळकांना मुंबईच्या न्यायालयात आणण्यात आले.

टिळकांनी पहिल्या दिवशी न्यायालयात आपली बाजू मांडली. ते म्हणाले की सरकारला दोष देणे किंवा कारभारामध्ये सुधारणा मागणे म्हणजे राजद्रोह नव्हे. आपल्या देशबांधवाच्या दास्यमुक्तीसाठी, सरकार बदलण्यासाठी लढा देणे हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध अधिकार आहे. त्यांचा जो अभियोग होता तो नऊ ज्युरींसमोर चालू होता. त्या नऊ ज्युरींपैकी सात युरोपिअन होते आणि दोन भारतीय होते. केसरीमधल्या दोन अग्रलेखांचा आधार घेऊन टिळकांना अटक

झाली होती. त्यामुळे ते ज्युरींना उददेशून म्हणाले की आपल्या देशामध्ये जो हक्क इंग्रजी वृत्तपत्रांना उपभोगता येतो तो मी खासच आपल्याकडे मागू शकतो आणि माझे ध्येय अत्यंत पवित्र आहे.

परंतु त्याचा ज्युरींवर काहीही परिणाम झाला नाही. उलट त्या ज्युरींनी टिळकांच्या अग्रलेखांचा अर्थ असा काढला की तुम्ही जर स्वराज्य दिले नाही, तसेच स्वराज्य देण्यास आरंभ केला नाही तर आम्हीदेखील बॉम्बगोळे फेकणे बंद करणार नाही आणि त्यांच्यावरच्या आरोपांची पुष्टी केली. आता न्यायमूर्ती दावर यांनी शिक्षा देणेच काय ते बाकी होते. परंतु त्या अगोदर ते टिळकांना म्हणाले, ''मिस्टर टिळक, शिक्षा सुनावण्याच्या अगोदर तुम्हाला काही सांगायचे आहे? तेव्हा टिळक जे बोलले ते न्यायालयामधल्या दगडी भिंतीवर तोफगोळे बनून आदळले. टिळक म्हणाले, की ज्युरींचा निर्णय काहीही असला तरी मी निरपराधीच आहे. वस्तुजाताच्या भवितव्यतेवर सत्ता गाजविणाऱ्या उच्चतर शक्ती अस्तित्वात आहे आणि केवळ स्वतंत्र राहण्यापेक्षा, हालअपेष्टा सोसूनच मी हाती घेतलेले कार्य अधिक ऊर्जीतावस्थेला यावे अशीच कदाचित त्या विधात्याची योजना असेल! आणि शेवटी टिळकांना ६ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. ३ वर्षे हद्दपार आणि ३ वर्षे सश्रम कारावास अशी ६ वर्षे.

बाहेर सगळा जनसमुदाय उभा होता. जेव्हा निकालपत्र वाचन चालू होते तेव्हा आता लोक काय करतील याची ब्रिटिश शासनाला भीती होती. लोक काय करतील सांगता येत नाही. ते न्यायालयात घुसतील देखील म्हणून त्यांनी काय केलं, खटला संपल्यानंतर टिळकांना अक्षरश: दुसऱ्याच दरवाज्याने बाहेर नेलं. त्यांना कुलाबा रेल्वेस्थानकावर नेण्यात आले. अहमदाबादला जाणारी रेल्वेगाडी उभी होती. त्यातून त्यांना साबरमतीला नेण्यात आलं आणि साबरमतीला पुढे काही दिवस ठेवलं. मंडालेला नेणार होते पण साबरमतीला काही दिवस ठेवलं आणि त्यामध्ये एक ते दीड महिन्याचा जो काळ गेला त्यामध्ये एक गोष्ट टिळकांच्या बाजूने घडली. त्यांचा सश्रम कारावास होता त्याच्यामध्ये त्यांनी कायदेशीर डावपेच केले आणि त्यांच्या सश्रम कारावासाचे रूपांतर साध्या कारावासात झाले. हा कारावास भोगण्यासाठी लोकमान्य टिळक ६ वर्षांसाठी मंडालेला गेले.

आता मंडालेच्या तुरुंगात ज्या कोठडीत टिळकांना ठेवलं होतं ती कोठडी कशी होती बघा. २० फूट लांब, १२ फूट रुंद असा तो लाकडी पिंजरा होता. पण टिळकांना भोजनघरात जाण्याची मुभा होती. त्यानंतर एखादा ब्राह्मण आचारीदेखील देण्याची सवलत होती. असं एक वर्ष गेल्यानंतर त्यांचे अमरावतीचे सहकारी दादासाहेब खापर्डे यांनी त्यांच्या सुटकेचे प्रयत्न चालू केले. परंतु टिळकांनी त्यांना सांगितले, कोणत्याही अटी स्वीकारून मला सुटका करून घ्यायची नाही. त्याला त्यांनी नकार दिला. दादासाहेब खापर्डे यांना टिळकांनी एक पत्र लिहिले. त्या पत्रामध्ये असे म्हटले, की माझ्या वयाला आता ५३ वर्षे पूर्ण झाली. अजून १० वर्षांच्या पलीकडे जगण्याची आशा मला नाही; परंतु त्या १० वर्षांमध्ये किमान ५ वर्षे तरी मला सार्वजनिक कार्यासाठी द्यायची आहेत आणि अटी स्वीकारून सुटका करून घेऊन ते शक्य नाही. कारण अटी स्वीकारून परत ब्रिटिशांची बंधने येणार. मग सार्वजनिक कार्य करता येणार नाही म्हणून त्यांनी त्या अटी स्वीकारण्यास नकार दिला. पुढे याच मंडालेच्या कारागृहात 'गीतारहस्य'सारखा अद्वितीय ग्रंथ टिळकांनी लिहिला. नोव्हेंबर १९१० तो मार्च १९११ या ५ महिन्यात तो ग्रंथ लिहिला.

गीतेवरचे त्यांचे चिंतन होते ते पूर्वीपासून चालू होते. गीतारहस्य ग्रंथ त्यांनी कुठे लिहिला तर आपल्या वह्यांच्या पानामध्ये. जेव्हा टिळक सुटले तेव्हा त्या वह्या मिळायला थोडा उशीर झाला तेव्हा त्यांच्या जवळच्या मंडळींना भीती वाटली की वह्या जप्त होताहेत की काय? सरकार परत देणार आहे की नाही? तेव्हा टिळक आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले, ''घाबरण्याचं कारण नाही. वह्या जरी सरकारच्या ताब्यात असल्या तरी ग्रंथ माझ्या डोक्यात जसाच्या तसा आहे. फुरसतीच्या वेळेला बसून तो ग्रंथ मी लिहून काढेन.'' काय सखोल चिंतन असेल बघा. त्या कारावासामध्ये त्यांना आपल्या जवळच्या मंडळींची आठवण यायची. त्यामध्ये आगरकर होते. गोपाळकृष्ण गोखले होते. अशा परिचितांच्या आठवणी, लेखन, वाचन, चिंतन यामध्ये त्यांचा तुरुंगवासाचा कालावधी संपला. १६ फेब्रुवारी १९१४ रोजी त्यांची कारावासातून सुटका झाली. पुण्यातल्या गायकवाड वाड्यामध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना रात्री १:३० वाजता आणून सोडले.

दुसऱ्या दिवशी पुण्यामध्ये अक्षरश: वाऱ्यासारखी बातमी पसरली. टिळक सुटले! आणि त्यांना भेटण्याकरीता सर्व जातीजमातीच्या लोकांनी रांग लावली. टिळक सुटल्यानंतर साधारण २ महिन्यांच्या आत १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धाला सुरुवात झाली. आता त्यांनी काय केलं, बाणेदारपणा दाखविला. क्लृप्ती काढली. त्यांनी एक पत्र प्रसिद्ध केले. या महायुद्धाला इंग्रज सरकारला पाठिंबा घोषित केला. पण टिळकांसारख्या व्यक्तिमत्त्वाने पाठिंबा दिला म्हणून ब्रिटिशसुद्धा आनंदित झाले आणि त्यांनी त्यांच्यावरील काही निर्बंधसुद्धा हटवले. याचा उपयोग टिळकांनी जहाल गट अधिक बळकट करण्यास केला.

सन १९१४ मध्ये शेवटी काँग्रेसचे अधिवेशन हे मद्रासला झाले. त्या अधिवेशनाला मात्र टिळक जाऊ शकले नाहीत. गोपाळकृष्ण गोखलेंशी त्यांनी सल्लामसलत केली. त्यांना काही सूचना केल्या. पण सन १९१५ च्या अधिवेशनाला मात्र मुंबईत उपस्थित होते. १९१५

साली मुंबईत जे काँग्रेसचे अधिवेशन झाले त्याच्यामध्ये राष्ट्रवादी गट, जहाल गटाला काँग्रेसमध्ये पुन्हा प्रवेश देण्याचा ठराव संमत झाला. म्हणजे सुरतच्या अधिवेशनानंतर यांना बाहेर काढले होते, ते १९१५ मध्ये परत घेतले. आणि हा खऱ्या अर्थाने टिळकांचा विजय होता. टिळकांच्या स्पष्टवक्तेपणाचा विजय होता. टिळक नेहमी आपल्या जवळच्या मंडळींना सांगायचे की, मला अतिशय कडक बोलण्याची सवय आहे. आपण एखाद्याला तोडून बोलतो आणि आपला तो अवगुण आहे असं त्यांना वाटायचं. परंतु टिळक जरी कडक बोलत असले, त्यांचा स्वभाव जरी कडक असला तरी जनतेचं त्यांच्यावरचं प्रेम हे तितकंच होतं.

त्यांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली. त्या दिवशी दि. २३ जुलै १९१६ला गायकवाड वाड्यामध्ये त्यांचा जाहीर सत्कार झाला. जनतेच्या वतीने त्यांना मानपत्र अर्पण करण्यात आले. त्याला १००० मंडळी उपस्थित होती. १ लाखाची थैली टिळकांना अर्पण करण्यात आली. टिळकांनी आपल्या भाषणामध्ये त्या थैलीचा उपयोग वैयक्तिक कामासाठी न करता सार्वजनिक कार्यासाठी करणार असल्याचं सांगितलं आणि लोकांना आवाहन केलं की, 'उठा आणि सज्ज व्हा, कामाला लागा'. त्याचं कारण त्या अगोदर २८ एप्रिल १९१६ला त्यांनी साम्राज्यांतर्गत स्वराज्यासाठी होमरुल लीगची स्थापना केली होती. आणि पुढे ही होमरुल लीगची चळवळ फोफावत गेली.

होमरुल म्हणजे काय? तर स्वत:च्याच घरातला कारभार स्वत:कडे राखायचा. बाकी कामकाज आहे तसंच ठेवायचं. शासन यंत्रणा जी आहे ती आहे तशीच ठेवायची आणि कारभारामध्ये मात्र परिवर्तन करायचं असा होमरुलचा अर्थ त्यांनी काढला होता. त्यामध्ये त्यांना स्वत:च्या अधिपत्याखाली एखादी संघटना हवी होती. म्हणून त्यांनी होमरुल लीगची स्थापना केली. काँग्रेसमध्ये जरी ते असले तरी तेवढं त्यांचं वर्चस्व नव्हतं. होमरुल लीगच्यामुळे ते येणार होतं म्हणून ही संघटना स्थापन झाली. आणि ही चळवळ १९१६ला फोफावत गेली. आता होमरुल चळवळ ही डॉ. ॲनी बेझंट यांनीही स्थापन केली होती. मद्रास प्रांतामध्ये त्यांचे कार्य होते. त्यांचीदेखील एक होमरुल संघटना होती. दोन्हींची नावे सारखी होती, परंतु दोन्ही संघटना पूर्णपणे वेगळ्या होत्या. तरीही डॉ. ॲनी बेझंट आणि लोकमान्य यांच्यामध्ये चांगला समन्वय होता. लखनऊच्या अधिवेशनाला हे दोघेही उपस्थित राहिले. डिसेंबर १९१६ ला हे अधिवेशन भरलं त्या अधिवेशनाला टिळक रेल्वेने गेले. सांगायचं तात्पर्य म्हणजे अक्षरश: प्रत्येक रेल्वेस्थानकावर 'टिळक महाराज की जय' अशा घोषणा देण्यात आल्या. लखनौकरांनीदेखील त्यांचे कलकत्त्याप्रमाणे स्वागत केले. पुन्हा बग्गीचे घोडे सोडले आणि स्वयंसेवकांनी स्वत: अधिवेशन स्थळापर्यंत ती बग्गी ओढत नेली. प्रत्यक्ष अधिवेशनाला दि. २६ डिसेंबर १९१६ ला सुरुवात झाली. त्या मुख्य मंडपामध्ये लोकमान्य टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांचे जेव्हा आगमन झाले तेव्हा त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या काँग्रेसच्या २३०० प्रतिनिधींनी आणि त्यांच्या तीनपट संख्येने आलेले उपस्थित लोक म्हणजे ६९०० एवढ्या सगळ्यांनी दोघांचे अत्यंत हृदयपूर्वक स्वागत केले. या लखनऊ काँग्रेस अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणजे हिंदू मुस्लिम ऐक्य आणि या ऐक्याचे शिल्पकार होते लोकमान्य टिळक! त्यामुळे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी त्यांनी मुसलमानांना प्रांतिक कायदेमंडळामध्ये राखीव जागा देण्याचा ठराव संमत केला. काँग्रेस कार्यकर्ते आणि मुस्लिम लीग कार्यकर्ते या दोघांचीही एकत्र बैठक बोलवली. याला लोकांचा काहीसा विरोध होता. परंतु टिळकांचे म्हणणे असे होते की, मुस्लिमांनाही स्वराज्याच्या प्रवाहात आणायला हवं. त्यांना काही राखीव जागा, काही विशेष अधिकार दिल्याशिवाय स्वराज्य मिळवण्यावरचं त्यांचं दायित्व आहे ते तितक्या प्रमाणात वाढणार नाही आणि म्हणून तो ठराव संमत केला.

लखनऊ काँग्रेसच्या अधिवेशनाचं वैशिष्ट्य असं आहे की स्वराज्याची मागणी या अधिवेशनामध्ये एकमताने करण्यात आली. आणि हिंदू आणि मुसलमानांनी ही मागणी एकमुखाने केली. त्यानंतर टिळकांचे दौरे सुरू झाले. कानपूरच्या गाजलेल्या सभेत टिळक जनतेला उद्देशून म्हणाले की, ब्रिटिश साम्राज्यामध्ये आम्ही राहू ते बरोबरीच्या नात्यानं. केवळ भारवाहक वा दास म्हणून राहायची आमची मुळीच इच्छा नाही. मेंढ्यांच्या कळपात वाढलेल्या, सिंहाच्या छाव्याला पाण्यात पडलेलं स्वत:चं प्रतिबिंब पाहून ज्याप्रमाणे स्वत:च्या आस्तित्वाची आणि खऱ्या स्वरूपाची जाणीव होते तशीच ती आता भारतीयांना देखील झाली आहे. लोकमान्यांच्या अशा भाषणामुळे पंजाब आणि लगतच्या प्रांतामध्ये त्यांच्या भाषणावर बंदी आली. मग शेवटी त्यांनी वऱ्हाड आणि मध्यप्रांताचा दौरा केला. त्या दौऱ्यात रेल्वेने, मोटारीने असा प्रवास केल्याने त्यांची फार धावपळ झाली. जनतेला भेटण्यासाठी गावोगाव, खेड्याखेड्यात टिळक गेले. अक्षरश: लोक त्यांच्या पाया पडण्यासाठी खेचाखेची करायचे. या दौऱ्यात त्यांचा मधुमेहाचा आजार बळावत होता. त्यांच्या पायाला सूज यायची तरीही लोक त्यांच्या पाया पडण्यासाठी धडपडायचे. दौऱ्यानंतर जेव्हा थोडंसं बरं वाटायला लागलं तेव्हाच बिटिश पत्रकार सर व्हॅलेटायिन चिरोल याने रँड व आयर्स्टच्या खुनाचं खापर लोकमान्य टिळकांवर फोडलं. टिळकांचा त्या खुनामध्ये काही संबंध नव्हता. त्यामुळे टिळकांनी अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला होता. आणि त्यांची अंतिम लढाई १९१८ साली लढण्यासाठी ते इंग्लडला आगबोटीने गेले होते. जवळपास वर्ष सव्वावर्ष तिथे राहिले पण त्या न्यायालयीन

लढाईमध्ये टिळकांना अपयश आलं. त्यानंतर दि. २७ नोव्हेंबर १९१९ला ते पुन्हा भारतामध्ये आले. इथे आल्यानंतर सर्व परिस्थिती पाहून त्यांना जाणीव झाली की भारताच्या राजकीय क्षितिजावर एक सौम्य पण नवीनच सूर्य मोहनदास गांधी यांच्या रूपानं उगवलेला आहे. अर्थात गांधी आणि टिळकांच्या विचारांमध्ये समन्वय होता. अमृतसरच्या अधिवेशनात त्याचं प्रत्यंतर आलं. बहुतेक सर्व ठरावामध्ये त्यांचं आणि गांधीजींचं एकमत झालं, परंतु इंग्रज सरकारचं युद्धासंबधीचं जे धोरण होतं त्याला गांधीजींनी बिनशर्त सहकार्याची भूमिका घेतली. लोकमान्य टिळकांनी मात्र शब्दप्रयोग केला तो म्हणजे 'प्रतियोगी सहकार्य' म्हणजे मुद्यांवर आधारलेलं सहकार्य. गांधीजींनी लगेच उल्लेख केला. माझं बिनशर्त सहकार्य ब्रिटिशधार्जिणं नाही असं ते म्हणाले. परंतु पुढच्या ४-५ महिन्यांमध्ये गांधीजींना जो ब्रिटिश शासनाकडून अनुभव आला त्याच्या आधारावर दि. १४ मे १९२०ला वाराणसीच्या काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकीत गांधीजी म्हणाले की, असल्या या सैतानी सरकारशी कोणत्याही प्रकारचं सहकार्य करणं म्हणजे पाप आहे आणि तिथे त्यांनी असहकार्याची भूमिका घेतली. लोकमान्य टिळकांनी मात्र या भूमिकेला सावध पाठिंबा दिला. त्यांचं म्हणणं होतं की, या असहकार्यामुळे जनतेला स्वसुखपरान्मुख राहून स्वार्थत्याग करावा लागेल. आणि याला जनता कितपत साथ देईल अशी त्यांना शंका होती. परंतु आपल्याला माहीत आहे की हे असहकार आंदोलन भारतीय जनतेनं अक्षरश: उचलून धरलं. परंतु इतिहास असंदेखील सांगतो की दोन वर्षामध्ये असहकाराची चळवळ गांधीजींच्यामुळे मागे घेतली गेली. परंतु या असहकार आंदोलनामुळे आपल्या देशात गांधीयुग सुरू झालं.

त्यानंतर सततच्या दगदगीमुळे टिळकांचा मधुमेहाचा आजार बळावला आणि दि. २१ जुलै १९२० ला टिळकांच्या अंगामध्ये हिवताप चढला. चार-पाच दिवसात त्यांची प्रकृती आणखीनच खालावली. दि. ३१ जुलैच्या अगोदर दोन दिवस ते भ्रमावस्थेत गेले नंतर बेशुद्धावस्थेत गेले. भ्रमावस्थेत असताना टिळक बोलायचे, भारताला स्वराज्य मिळाल्याखेरीज भारताची भरभराट होणार नाही. आणि भ्रमावस्थेतलं त्यांचं शेवटचं वाक्य होतं की, माझ्या देशाला मी कसा काय विसरेन? आणि दि. ३१ जुलै १९२० ला रात्री १२ वाजून ४० मिनिटांनी म्हणजे १ ऑगस्टला टिळकांनी मुंबईच्या सरदारगृहामध्ये अखेरचा श्वास घेतला. भारताच्या स्वराज्याचं स्वप्न पाहणारे, स्वराज्य सत्यात उतरविण्यासाठी आपलं आयुष्य देणारे, वेचणारे आणि झगडणारे असे लोकमान्य गेले.

त्यांची त्याच दिवशी मुंबईत महायात्रा निघाली. सराफ बाजार, मोती बाजार असं करत गिरगाव चौपाटीपर्यंत ती यात्रा आली आणि तिथे टिळकांवर अग्निसंस्कार करण्यात आले. आपले कविश्रेष्ठ कुसुमाग्रज एकदा गिरगाव चौपाटीवरचा लोकमान्यांचा पुतळा पाहण्यासाठी आले होते. तेव्हा टिळकांचा पुतळा बघून त्यांना कविता सुचली. ते शब्द असे होते, 'ती अजिंक्य छाती ताठर अन् रणशील । जी पाहून सागर थबके परत आत ।' म्हणजे टिळकांनी साहित्यिकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे प्रेरणा दिली. एव्हढेच नाही तर अशिक्षित बहुजन समाजापासून ते सुशिक्षित क्रांतिकारकांपर्यंत, विचारवंतांपर्यंत प्रत्येकाचे ते प्रेरणापुरुष होते. असे हे लोकमान्य गेल्यानंतर प्रत्येक भारतीयाला दु:ख वाटणं साहजिकच आहे. त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने स्वातंत्र्यवीर सावरकरांचं शनिवारवाड्यावर भाषण झालं. दि. २३ जुलै १९५६च्या या भाषणामध्ये सावरकर म्हणाले, ''भारताचं स्वातंत्र्य समीप आणण्यासाठी लोकमान्य टिळकांचा त्याग आणि अविश्रांत परिश्रम कारणीभूत झाले. आज त्यांच्या जन्मशताब्दीचा मुख्य कार्यक्रम राजधानी दिल्लीमध्ये होऊ शकला नाही ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. आज टिळकांच्या सन्मानार्थ राजधानीमध्ये २१ तोफांची सलामी द्यायला हवी होती आणि भारताच्या राष्ट्रजनकाचा तो यथोचित सन्मान ठरला असता.'' असा सावरकरांना सार्थ अभिमान होता लोकमान्य टिळकांचा!

अशा या लोकमान्यांच्याबद्दल आज या शिक्षणसंस्थेच्या वतीने लोकमान्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्यावर बोलण्याचा योग आला आणि आपण सर्वांनी शांतचित्ताने ऐकलंत. मी तुमच्या मॅडमना विचारलं होतं की, विद्यार्थी इतका वेळ बसतील का? त्यांना अर्धा तास बसायची सवय. पण खरोखरीच त्यांच्या बुद्धीला दाद द्यायला हवी. त्यांच्या विचारशक्तीला दाद द्यायला हवी की, एवढा वेळ वैचारिक पद्धतीचं भाषण ते ऐकताहेत. श्रीकाकांनी खऱ्या अर्थांनी चांगली मुलं घडवली आहेत. सगळ्या शिक्षक वर्गालाही दाद द्यायला हवी. आणि अशा या तुमच्या संस्थेच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो आणि आपली सर्वांची रजा घेतो. जयहिंद!

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com






**अभूतपूर्व अशा लॉक डाऊनमुळे एप्रिल/मे २०२० चे अंक प्रकाशित होऊ शकले नाहीत याची कृपया नोंद घ्यावी – *संपादक***

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. | Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०